पुष्प ५ वें

# अमर–चीन

लेखक :

श्रीपाद जोशी

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय का. वा.
दा. क्रं. ५२००

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि
वाचनालय

IRBK-0105300

चित्रशाळा प्रकाशन-पुणें.

शिरीष माला

दा.क्र.- ५३००.

शिरीष माला ५ वें पुष्प

अनुक्रमांक

# मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

30 APR 1977

[ क्रु. मा. प. ]

दा.क्र.-५३००

शिरीष माला ५ वें पुष्प

# अमर-चीन

[ पांच चिनी कथांचा अनुवाद ]

लेखक:

श्रीपाद जोशी

५३००

—चित्रशाळा प्रेस, प्रकाशन विभाग—

१०२६

IRBK-0105300

प्रथमावृत्तीचे सर्व हक्क चित्रशाळा प्रेस यांचे स्वाधीन.

पुढील सर्व हक्क लेखकाकडे.

मुद्रक—प्रकाशक
दामोदर त्र्यंबक जोशी,
बी. ए. (टिळक)
चित्रशाळा प्रेस, १०२६ सदाशिव, पुणें २.

अनुक्र. १५८०५
वि.भा.
क्रमांक ८२५
नों. दि. २९।२।५५
...लय शाखा.

## : १ :  वावडी

— :o: —

कडाक्याची थंडी पडली आहे. जमिनीवर पडलेलें बर्फ अजून वितळूं लागलेलें नाहीं; पानें गळून पडलेल्या झाडांच्या वठलेल्या फांद्या स्वच्छ निरभ्र आकाशाकडे बोट दाखवीत आहेत. अशा वेळीं पेकिंगमध्यें वावड्या उडूं लागलेल्या पाहून मला भारी आश्चर्य वाटत आहे आणि मन कांहींसें उदास होत आहे. आश्चर्य एवढ्या-साठींच कीं वावड्यांचा मोसम अजून बराच दूर आहे आणि उदास अशासाठीं वाटतंय् कीं—

आमच्या शहरांत पतंग उडविण्याचे दिवस म्हणजे वसंत ऋतूचा दुसरा महिना. आकाशांतून भिंगऱ्यांचा मंजुळ ध्वनि ऐकूं आला कीं जरा वर पहा. पांढऱ्या, तांबड्या, निळ्या, पिवळ्या—तऱ्हेतऱ्हेच्या वावड्यांनीं आकाश व्यापून टाकलेलें तुम्हांला दिसेल. बिन आवाजाचे भले मोठे पतंगहि त्या घोळक्यांत असतात. त्यांना करकरणाऱ्या भिंगऱ्या लावलेल्या नसतात. हे पतंग खूप उंच जातात व एकाकी नि दुःखी दिसतात. याच वेळीं अशोकवृक्षाला पालवी फुटूं लागते व सफर-चंदाला फुलें येऊं लागतात. हीं फुलेंहि जणूं रंगीबेरंगी वावड्याच आहेत असा भास होतो. हें सर्व वातावरण वसन्ताचा सन्देश साऱ्या जगाला यावयास धडपडत असतें.

पण मी या वेळीं कोठें आहे ? माझ्या सभोंवार हिंवाळ्याचा कडाका पसरलेला आहे. माझें अतीत यौवन आणि आमच्या शहरांतील वसन्त ऋतु या दोन्ही गोष्टी येथील आकाशावर आपली छाया पसरवीत आहेत असें वाटतें.

मला पतंग उडविण्याचा मुळींच षोक नव्हता. किंबहुना त्या गोष्टींचा मला अत्यंत तिटकारा होता असें म्हटलें तरी चालेल. उडाणटप्पू पोरांचें खेळ घालविण्याचें तें एक साधन आहे असें मला वाटे. पण माझ्या दहा वर्षांच्या धाकट्या भावाला पतंग उडविण्याची फारच इच्छा व आवड होती. तो अत्यंत अशक्त होता व नेहमीं आजारी पडत असे. म्हणून त्याला पतंग विकत घ्यायला कोणी पैसाहि देत नसे व मजबरोबर खेळण्याची तर त्याला परवानगीच नव्हती. यामुळें तो दिवसभर एक-सारखा आकाशाकडे टक लावून बसत असे. कटाकटींमध्यें एकादी वावडी तुटून खालीं येऊं लागली कीं तो जोरानें किंकाळूं लागे आणि एकादा पतंग वर वर जाऊं लागला कीं तो आनंदानें गात गात नाचूं लागे. त्या वेळीं मी त्याला मूर्ख समजत असे.

एके दिवशीं माझ्या ध्यानांत आलें कीं अलीकडे तो फारसा दिसत नाहीं आणि मग मला आठवलें कीं अगदीं शेवटीं जेव्हां मी त्याला पाहिलें तेव्हां तो आमच्या घरामागील बागेंत मोडके तोडके बांबूचे तुकडे गोळा करीत होता. मला वाटलें, येथें कांहींतरी डाळ शिजत असली पाहिजे; आणि म्हणून मी अडगळीच्या खोलीकडे आपला मोर्चा वळविला. खोलीचा दरवाजा बंद होता. एक जोराची लाथ हाणून मी तो उघडला. धुळीनें भरलेल्या त्या अडगळींत तो एका टेबलावर बसला होता. त्याच्या समोरच एक भिंगऱ्यांची जोडी पडली होती. लाल रंगाच्या कागदाची वावडी जवळ जवळ तयार झाली होती. त्या बदमाषाची ती चोरी पकडण्यांत मला अतोनात आनंद झाला. आणि मला न कळत, लपूनछपून असले धंदे करीत बसल्या-बद्दल मला त्याचा भयंकर रागहि आला. 'ही सगळी मेहनत एका पोरकट भिकार खेळण्यासाठीं अं!' मी मनाशीं म्हटलें; आणि रागारागानें त्याच्या हातून वावडी हिसकून घेऊन मी तिची शेंपूट तोडून टाकली, कागद फाडून टाकला, बांबूचे तुकडे मोडून तोडून टाकले आणि भिंगऱ्या दूर कचऱ्यांत भिरकावून दिल्या. मी वयानें त्याच्याहून मोठा होतों यामुळें ताकतीनेंहि त्याला भारीच होतों, म्हणून जय माझाच होता. त्याला तेथें तसाच भग्नहृदय सोडून मी मोठ्या कुऱ्यांत तेथून निघून आलों. या सर्व प्रकारामुळें त्याच्या मनाची काय स्थिति झाली असेल हें मला समजलें नाहीं; समजून घेण्याची मी पर्वाहि केली नाहीं.

पण शिक्षेचा दिवस अखेरशेवटीं आलाच. आम्ही एकमेकांपासून दूर झाल्याला वरींच वर्षे लोटलीं होतीं. मी आतां चाळिशी गांठली होती. दुर्दैवानें (?) लहान मुलांच्या संबंधींचें विदेशी भाषेंतील एक पुस्तक यावेळीं माझ्या वाचण्यांत आलें. तेव्हां कुठें माझ्या डोक्यांत प्रकाश पडला कीं मुलांना खेळ ही एक अत्यंत आवश्यक बाब आहे. व खेळणीं हीं एक त्यांना देवदूताइतकीं प्रिय असतात. त्या वेळीं माझ्या डोळ्यांसमोर वीस वर्षांपूर्वीचें तें चित्र एकाएकीं उभें राहिलें. त्यापूर्वीं त्या प्रसंगाची कधीं चुकूनहि मला आठवण झाली नव्हती. माझें हृदय शिशाच्या तुकड्या-प्रमाणें जड होऊं लागलें. कुठल्यातरी दुःखपूर्ण विहिरींत बुडून तें अधिकाधिक खालीं जात आहे असा मला भास झाला.

काय केलें असतां आपली चूक भरून निघेल याची मला पूर्ण कल्पना होती. मी त्याला एक वावडी थाडून दिली असती, त्याला खेळावयास उत्तेजन दिलें असतें, त्यांत त्याला मदत केली असती किंबहुना मी स्वतः त्याच्याबरोबर खेळलोंहि असतों, (कारण मी त्याच्याबरोबर खेळावें अशी त्याची फार उत्कट इच्छा होती.) आम्ही हंसलों असतों. गायलों असतों, हुंदडलों असतों...हें सर्व खरें. पण...पण या दरम्यानच्या काळांत माझ्याप्रमाणें त्यालाहि दाढीमिशा फुटल्या होत्या! वेळ टळून गेली होती!

पण समजा, जर मी त्याची माफी मागितली आणि तो म्हणाला, "छान! कशाला मनावर घेतां तुम्ही तें?" तर मात्र माझ्या मनाचें समाधान होईल.

हाच काय तो एक मार्ग होता.

यानन्तर जेव्हां मी त्याला भेटलों तेव्हां जीवनानें आमच्या चेहऱ्यांवर आपल्या खाणाखुणा करून टाकल्या होत्या. माझा अगदींच विरस झाला. आमच्या गप्पा-गोष्टींचा ओघ हळू हळू लहानपणींच्या दिवसांकडे वळला. अखेर मोठी हिम्मत करून मी त्या वावडीच्या प्रसंगाचा उल्लेख केला; आणि तो सर्व माझा गद्धेपंचविशींतील मूर्खपणा होता असें मी त्याच्याजवळ कबूल केलें. माझी कल्पना होती—नव्हे मी त्याची वाटच पहात होतों—कीं तो म्हणेल, "जाऊं द्या हो! तें कशाला मनावर घेतां तुम्ही आतां?"—आणि अशा प्रकारें तो मला उदार मनानें क्षमा करील व मग माझ्या मनावरील पश्चात्तापाचें ओझें हलकें होईल.

" काय ? खरोखरीच असं घडलं होतं ? " तो मोठ्या आश्चर्यानें उद्गारला.

अपेक्षाभंगामुळें माझा अगदीं विरस झाला. त्यानें माझें सगळें बोलणें अशा प्रकारें ऐकून घेतलें कीं जणूं ती दुसऱ्याच कोणाची तरी गोष्ट असावी. त्याला त्यासंबंधीं कांहींच आठवत नव्हतें. अगदींच विसर पडला होता त्याला. तिरस्कार नाहीं, माफी नाहीं, कांहीं म्हणतां कांहीं नाहीं. आतां मी त्याची माफी कशी मागणार ? कारण हें सगळें भूत माझ्याच डोक्यांत होतें.

आतां मी काय करावें ? यापुढें हें पश्चात्तापाचें ओझें मला माझ्या हृदयावर सदैव बाळगावें लागणार !—

लाइसून

## : २ : एक लहानशी घटना

आमच्या खेडेगांवांतून या राजधानीच्या शहरीं आल्याला मला सहा वर्षे होऊन गेलीं. पण हा काळ कसा हां हां म्हणतां निघून गेला हें समजलें सुद्धां नाहीं. दरम्यानच्या काळांत अशा पुष्कळशा घटना घडल्या कीं ज्यांना ' राजकीय गोष्टी ' असें संबोधिलें जातें. यांपैकीं कित्येक मी आपल्या डोळ्यांनी पाहिल्या व कित्येकांविषयीं मी लोकांच्या तोंडून ऐकलें. पण त्यांपैकीं एकाहि घटनेनें माझ्या मनावर कांहीं विशेष परिणाम केला नाहीं. उलट त्या गोष्टींच्या आठवणीनें माझा चिडखोरपणा अधिकच भडकतो आणि जसजसे एकामागून एक दिवस लोटत आहेत तसतशी लोकांविषयींची माझी घृणाहि वाढत आहे. परन्तु एक लहानशी घटना मात्र मला खूप अर्थपूर्ण वाटते; आणि आजहि ती माझ्या स्मृतिपटलांवर पूर्वीप्रमाणेंच ताजी आहे.

लोकसत्ताक राज्य स्थापन झाल्याला पांच वर्षे पूर्ण होऊन गेलीं होतीं. सहावें वर्ष चालू होतें. कडाक्याच्या थंडीचे दिवस होते. खूप जोरांत भिरभिरणारे उत्तरेकडील थंडगार वारे सुरू झाले होते. पोटाची खळगी भरण्यासाठीं मला भल्या पहाटे उठावें लागे. कामावर जातांना मला वाटेंत क्वचितच कुणी भेटे.

याच हिंवाळ्यांतली गोष्ट. एके दिवशीं पहाटे उठून कामावर जाण्यास तयार झालों. थंडी अगदीं मी म्हणत होती. यामुळें जवळपास एकादें वहानहि मिळेना. खूप पायपीट केल्यावर अखेर शेवटीं एक रिक्शा मिळाला.

" कुठ जायचंय् बाबूजी ? " त्यानें विचारलें.

"दक्षिण दरवाजा!" मी उत्तरलों व दराची घासाघीस न करतांच रिक्शांत बसलों; कारण त्यामुळें मला वेळेवर कामाच्या जागीं पोहोंचतां आलें नसतें.

रिक्शा भरधांव निघाला. थोड्या वेळानें वारें जरासें थांबलें. जोराच्या वाऱ्या-मुळें सडकेवरील कचरा आणि धूळ पार उडून गेलीं होतीं व सडक अगदीं स्वच्छ दिसत होती. रिक्शावाला अगदीं जीव घेऊन पळत होता. आम्ही दक्षिण दरवाजा-जवळ पोहोंचतों न पोहोंचतों इतक्यांत एकदम समोरून कोणीतरी आलें आणि जोरानें रिक्शावर आपटून धाडदिशीं जमिनीवर कोसळलें.

ती एक बाई होती. तिचे केस अधून मधून पांढरे झाले होते; आणि तिच्या शरीराभोंवतीं घाणेरडीं लक्तरें गुंडाळलेलीं दिसत होतीं. सडकेच्या एका बाजूनें दुसऱ्या बाजूकडे जाण्याचा प्रयत्न करीत असतां योगायोगानें अचानकपणें ती आमच्या रिक्शासमोर आली. रिक्शावाल्यानें जरा बाजूला होऊन तिची टक्कर टाळण्याचा प्रयत्न केला. पण त्या बाईचीं वाऱ्यामुळें उडणारीं लक्तरें रिक्शाच्या दांडींत अडकलीं. रिक्शावाल्यानें आपला वेग कमी केला होता म्हणून बरें नाहींतर ती खूप जोरांत रिक्शावर आदळली असती व तिला भयंकर स्वरूपाची इजा झाली असती.

आम्ही थांबलों. ती बाई गुडघे व पाय टेकून जमिनीवर अजून ओणवीच होती. तिला विशेष कांहीं लागलें नाहीं याबद्दल मला खात्री होती. शिवाय रिक्शाशीं टक्कर होतांना कुणी पाहिलेंहि नव्हतें. यामुळें त्या ठिकाणीं जास्त वेळ थांबून रिक्शावाला स्वतःला निष्कारण खटल्याच्या जाळ्यांत गोवून घेण्याचा प्रयत्न करीत आहे हें पाहून मला त्याचा भयंकर राग आला. कारण त्या सर्व घोटाळ्यामुळें मला अधिकाधिक उशीर होऊं लागला होता.

"कांहीं झालें नाहीं तिला! चला, जल्दी करा!" मी म्हणालों.

पण त्यानें तें ऐकलें नाहीं कीं जाणून बुजून न ऐकल्यासारखें केलें कोण जाणे. त्यानें रिक्शा एका बाजूला ठेवून दिला आणि अगदीं हळुवार हातानें त्या बाईस उठविलें. तिच्या दंडांना धरून तिला उभें केलें आणि विचारलें,

"कुठं लागलं बिगलं तर नाहीं ना?"

" लागलंय् तर ! " त्याच्या अंगावर रेलत ती म्हणाली. मी मनांत म्हटलें, " तुला पडतांना मी पाहिलंय्, तूं जोरांत आदळली नाहींस याची मला खात्री आहे. मग तुला कसं लागलं ग ?–नक्कीच ढोंग करीत असली पाहिजेस तूं. अगदीं असहनीय आहे हें तुझें ढोंग ! अन् हा बेटा रिक्शावाला आपल्याच हातानें आपल्या पायांवर दगड मारून घेतोय्. निसट म्हणावें आतां कसा निसटतोस तो या पोलिसांच्या व खटल्याच्या जंजाळांतून ! "—

पण त्या बाईच्या तोंडून 'लागलंय् तर !' हे शब्द ऐकून त्या रिक्शेवाल्यावर कांहीं विशेष परिणाम झाला नाहीं. पण तो जेव्हां तिचा हात पकडून तिला घेऊन निघाला तेव्हां मात्र मला मोठें नवल वाटलें. माझी नजर समोरच्या पोलिस गेटाकडे गेली. अन् पाहतों तों काय ? रिक्शेवाला त्या बाईला घेऊन तिकडेच जात होता. गेटाच्या बाहेरच्या बाजूस कोणीहि नव्हतें: म्हणून तो तिला घेऊन आंत गेला.

ते आंत जातांच मला कसेसेंच झालें. का कोण जाणें, पण त्या वेळीं मला असा भास झाला कीं तिचें तें धुळीनें माखलेलें शरीर खूप मोठें झालें आहे. जसजसें तें माझ्याजवळ येऊं लागलें तसतसें तें अधिकाधिक मोठें होऊं लागलें. आणि शेवटीं शेवटीं तर तें इतकें अजस्र झालें कीं त्याला पाहण्यासाठीं मला आपलें डोकें वर उचलावें लागलें. हें सर्व होत असतांना मला असें वाटूं लागलें कीं, मजवर कसलें तरी भयंकर ओझें पडत आहे. तें ओझें त्या शरीराच्या बाजूनें येत होतें. त्या ओझ्याच्या भारानें माझ्या उबदार लोकरी ओव्हरकोटाच्या आंत लपलेल्या नीचतेला आणि अधमतेला ओढून बाहेर काढलें. मी अगदीं गळून गेलों. माझ्या शरीरांतील सगळें रक्त जणू गोठून गेलें होतें. अगदीं विमनस्क स्थितींत कसलाहि विचार न करतां मी तेथें चुपचाप बसून राहिलों. अखेर त्या गेटांतून एक पोलिस अधिकारी बाहेर आला. तो मजकडे येत आहे असें पाहून मी रिक्शांतून खालीं उतरलों. " दुसरा रिक्शा करावा लागेल तुम्हांला ! हा मनुष्य तुम्हांला घेऊन जाऊं शकणार नाहीं " तो अधिकारी सौजन्यानें म्हणाला.

कसलाहि विचार न करतां मी खिशांत हात घातला आणि मूठभर पैसे काढून त्या अधिकाऱ्याला देत म्हणालों, " हे द्या त्या रिक्शेवाल्याला. "

वारा पूर्णपणें बंद झाला होता; पण सडक अजून निर्मनुष्यच होती. चालतां चालतां माझ्या डोक्यांत विचारांची गर्दी उसळली. पण आपल्या स्वतःविषयीं विचार करण्याची मला भीति वाटत होती. जें काहीं घडलें होतें त्याचा विसर पाडून आपल्या त्या मूठभर पैशांना अधिक महत्त्व देण्याचा मी प्रयत्न करूं लागलों. पण "मी त्याला ते पैसे कशासाठीं दिले? इनाम म्हणून? आपल्या त्या कृत्यानंतर एका रिक्शेवाल्यासंबंधीं निर्णय घेण्यास मी स्वतःला लायक समजत होतों काय?" या आपल्या हृदयांत वारंवार उठणाऱ्या प्रश्नांचें उत्तर मी देऊं शकलों नाहीं.

हा अनुभव अजूनहि माझ्या आठवणींत अगदीं ताजा आहे. मी त्याविषयीं विचार करतों आणि आंतल्या आंत बेचैन होऊन जातों. त्यावेळचीं तीं सर्व लष्करी आणि राजकीय नाटकें आज मला बाळपणीं वाचलेल्या उच्च व अवघड वाङ्मयाप्रमाणें भासत आहेत. त्या वाङ्मयांतील एक ओळहि आतां मला आठवत नाहीं. परंतु ही छोटीशी घटना अहोरात्र माझ्या डोळ्यांसमोर नाचत असते, ती मला लज्जित करते, मला चांगलें बनण्याची प्रेरणा देते व माझी उमेद व हिम्मत वाढविते. ही घटना घडली त्या वेळीं जशी माझ्या डोळ्यांसमोर मूर्तिमंत होती अगदीं हुबेहूब तशीच आजहि ती मला दिसत आहे.

'लोहसून'

## : ३ : कुंग आय ची

लो चिंगचीं दारूचीं दुकानें चीनमधील इतर जिल्ह्यांतील गुत्त्यांपेक्षां वेगळीं आहेत. उदाहरणार्थ, येथें प्रत्येक दुकानांत एक मोठें चौकोनी टेबल असतें. या टेबलाखालीं शेगड्या ठेवून दारू गरम करण्यासाठीं चोवीस तास गरम पाणी तयार केलें जातें. दुपारीं व संध्याकाळीं जेव्हां मजुरांना सुटी मिळते तेव्हां ते तडक या दुकानांत येतात—वीस वर्षांपूर्वीं फक्त चार आण्यांला पेलाभर शराब मिळत असे. पण आतां तेवढ्या दारूची किंमत दहा आणे झाली आहे—आणि तेथेंच टेबलाजवळ उभे राहून गरम गरम शराब पितात; व अशा प्रकारें श्रमपरिहार करतात. एक आणा जास्त देऊन मजूर लोक सोयाबीनच्या खारवलेल्या शेंगा घेतात. दहा आण्यांहून थोडे जास्त पैसे दिले कीं मांसाची किंवा कबाबाची एक प्लेट मिळते. पण हे दारू पिणारे बहुतेक आंखूड कोटवाल्यांच्या जातीचे असतात. आणि त्यांच्याजवळ कांहीं थोड्या आण्यांहून जास्त पैसे क्वचितच असतात. लांब कोटवाले ( मोठ्या घराण्यांतील व सुखवस्तु लोकच लांब कोट वापरतात ! ) मात्र शराब व कबाब दोन्ही मागवतात व स्वतंत्र खोलींत बसून मोठ्या ऐटींत त्यांवर यथेच्छ ताव मारतात. स्वतंत्र किंवा खास खोलींत जातांना मोठ्या टेबलाजवळूनच जावें लागतें.

मी बारा वर्षांचा असतांना लो चिंगच्या अशाच एका गुत्त्यामध्यें नोकरीस लागलों. त्या गुत्त्याचें नांव होतें ' सुख-निवास ' आणि तो शहराच्या दाट वस्तीच्या भागांत होता. मजवर थोरामोठ्या लोकांची नजर पडावी इतकी लायकी मजजवळ आहे असें माझ्या मालकाला वाटलें नाहीं आणि म्हणून मला टेबलाच्या मागें राहूनच काम

करावें लाग. खालच्या दर्जाच्या लोकांशीं सौदा पटण्यास फारशी अडचण पडावयाची नाहीं, पण हे लोक बडबड फार करीत, व दारूच्या धुंदींत खूप धुमाकूळ घालीत. दुकानदाराच्या प्रत्येक हालचालीकडे ते संशयित नजरेनें पहावयाचे. टेबलाखालील मोठ्या पिपांतून वाटीनें जेव्हां दारू काढून घेतली जाई-तेव्हां हे लोक वांकून वांकून पहात. आणि जेव्हां दारूच्या वाडग्या गरम पाण्यांतून काढून पेल्यांत दारू ओतली जाई तेव्हां पुष्कळशा माना बगळ्यासारख्या उंच होत आणि पेल्यामध्यें आधींपासूनच पाणी तर टाकून ठेवलेलें नाहीं ना याची खात्री करून घेत. इतक्या सगळ्यांच्या डोळ्यांत धूळ फेकणें माझ्यासारख्याला कांहीं सोपें नव्हतें. तेव्हां थोड्याच दिवसांत गुत्त्याच्या मालकाला कळून चुकलें कीं, हा या कामाला अगदीं नालायक आहे. परंतु सुदैवानें मी ज्यांच्या शिफारशीनें नोकरीला लागलेलों होतों ते गृहस्थ म्हणजे एक बडे प्रस्थ होतें; यामुळें मला नोकरीवरून काढून टाकण्याऐवजीं शराब गरम करण्याचें काम सोपविण्यांत आलें.

आतां मी दिवसभर टेबलाच्या मागें उभा राहून पाणी तापवूं लागलों. तसा मी कामांत कधींहि अंगचोरपणा करीत नसें. परंतु एकसारखें तेंच तें काम करीत रहावें लागल्यामुळें जीव अगदीं कंटाळून जाई. दुकानदाराचा स्वभाव फार सर्रांट होता, व गिऱ्हाइकें मुर्दाड मनाचीं होतीं. त्यांचे आवाज शुष्क व नकोसे वाटत. अशा या खिन्न वातावरणांत आनंदी राहणें अगदीं अशक्य होतें. जेव्हां कधीं कुंग आय चीं दारू प्यायला म्हणून येई, तेव्हां मात्र मी अगदीं पोटभर हंसून बोलून घेई आणि म्हणूनच कदाचित् मला त्याची अजूनहि आठवण होत असते.

•

कुंग आय चीं हा एका मोठ्या घरंदाज कुळांतील होता. परन्तु तरीहि तो खास खोलींत न जातां मोठ्या टेबलाजवळ उभा राहूनच दारू पीत असे. तो चांगला धट्टाकट्टा व भरदार बांध्याचा होता. त्याच्या पिवळ्याधमक चेहऱ्यावर एक मजेशीर निळसर झाक मारीत असे. त्याच्या त्या चेहऱ्यावर सुरकुत्या तर असतच, पण कधीं कधीं लहान मोठे ओरखडेहि पडलेले दिसत. गुंतळ झालेल्या केसांची लहानशी दाढी त्याच्या हनुवटीखालीं लटकत असे. तसें पाहिलें तर तो नेहमीं एक लांब कोट घालून वावरत असे. पण तो कोट निदान दहा वर्षांचा तरी जुना असावा. त्याला अधून मधून मळके व घाणेरडे डाग पडलेले होते. तो बोलत असतां अधून मधून

अनुक्रम २५८८.८.
विभाग ८५११.९.९१५-५२
क्रमांक ८३२६
नों. १३९१२५/५५

## कुंग आय ची

त्याच्या तोंडून असे कांहीं आवाज व शब्द निघत कीं जे सर्वसाधारणपणें सुशिक्षित व साहित्यिक लोक विषयाला रंग आणण्यासाठीं योजतात. हे आवाज व हे शब्द सामान्य जनतेला समजत नसत. उदाहरणार्थ, ' चिर्हां, हूच्छें, इर्हा ' वगैरे !

जेव्हां तो गुत्त्यामध्यें येई तेव्हां पुष्कळशा अर्थपूर्ण नजरा त्याच्याकडे वळत आणि त्याच्या पाठोपाठ खिदळण्याचे अस्फुट आवाज ऐकूं येत. कोणीतरी त्याला विचारी, ' ओहो, कुंग आय ची ! तुझ्या चेहऱ्यावर हे आणखी नवे ओरखडे कोठून आले ? '

अशा प्रकारचे प्रश्न सुरू झाले कीं तो इतक्या कांहीं थंडपणें टेबलाजवळ येई कीं, जणूं त्यानें कांहीं ऐकलेंच नाहीं. " गरम गरम शराब दोन प्याले, आणि खारवलेल्या शेंगांची एक प्लेट ! " असें म्हणत तो नऊ आण्यांच्या पैशांची एक चळत टेबलावर रची.

" नक्कीच तूं पुन्हां चोरी सुरू केली आहेस. " अशाच एका प्रसंगीं दारुड्यांच्या पैकीं एकानें आक्षेपार्ह आवाजांत मोठ्यानें ओरडून त्याला उद्देशून म्हटलें.

यावर त्यानें डोळे वटारून विचारलें, "एकाद्याच्या सभ्यतेवर आणि इमानदारीवर तूं असा निराधार आरोप कसा काय करूं शकतोस. ? "

" आलाय मोठा सभ्यतावाला ! " कुल हू च्या घरून पुस्तकें चोरून नेण्याबद्दल तूं काल कसा लाथाबुक्क्यांचा प्रसाद खात होतास हें मी प्रत्यक्ष माझ्या डोळ्यांनीं बघितलंय म्हटलं वच्चेजी ! "

कुंग आय चीचा चेहरा रागानें लालबुंद झाला आणि त्याच्या कपाळावरील निळ्या शिरा तट्ट फुगून तडतडा उडूं लागल्या.

तो ओरडला, " पुस्तकें चोरणें ही मुळीं चोरीच होऊं शकत नाहीं. पुस्तकें चोरणें. साहित्यिकाचें काम–काय यालाच तुम्ही लोक चोरी म्हणतां ?......आणि तो तोंडाला येईल तें भकत सुटला. मधून मधून तो असंबद्ध म्हणीहि वापरी. उदाहरणार्थ, " मानव हा दारिद्र्याच्या वेळीं सहनशील असतो " वगैरे ! आणि यानन्तर "ची हिह, हो, चियहे, अहेह ' वगैरे आवाजांत त्यानें आपलें भाषण पुरें केलें. यावर सर्व लोक अगदीं पोट धरधरून हसूं लागले. प्रत्येकाचा चेहरा उल्हसित दिसूं लागला.

कुंग आय चीच्या माघारीं लोक त्याच्याविषयीं पुष्कळ गप्पा मारीत असत. ते म्हणत कीं, पूर्वीं त्यानें उच्च साहित्याचा चांगला अभ्यास केला होता; परंतु कुठल्याहि विश्व-विद्यालयांत त्याला प्रवेश मिळूं शकला नाहीं. विचाऱ्याजवळ पोट भरण्याचें कांहीं साधन नव्हतें; यामुळें त्याची स्थिति दिवसेंदिवस खालावतच गेली. इतकी कीं शेवटीं त्याला भिकेवर जगण्याची पाळी आली. त्याचें अक्षर फार सुरेख असल्यामुळें नुसत्या भातावर भूक भागविण्याइतकें काम त्याला सहज मिळे. परंतु त्याला दारूची चटक लागलेली होती व त्यामुळें तो अत्यंत सुस्त झाला होता. कांहीं दिवस तो एकाद्याकडे लिहिण्याचें काम करी आणि मग एकाएकीं मालकांचीं पुस्तकें, कागद, दौती, टाक वगैरे सामान घेऊन फरारी होई. असल्या नीच गोष्टी अनेक वेळां केल्या-मुळें त्याचा परिणाम असा झाला कीं, त्याला कामावर ठेवून घेण्यास कोणी तयार होईना. व मग या बेकारीच्या काळांत तो लहानसहान चोऱ्या करूं लागे.

परंतु आमच्या गुत्त्यांतील त्याचें वर्तन मात्र इतरांनीं अगदीं अनुकरण करावें असें होतें. कधीं कधीं जेव्हां त्याच्या खिशांत मुळींच पैसे नसत तेव्हां त्याचें नांवहि पांढऱ्या फळ्यावरील कर्जदारांच्या ( देणेकऱ्यांच्या ) यादींत नोंदलें जाई हें जरी खरें असलें तरी महिना संपण्यापूर्वींच त्याचें नांव फळ्यावरून पुसलें जाई. कारण तो आपली उधारी लागलीच फेडून टाकी.

वरील बाचाबाची झाल्यावर त्यानें एक पेलाभर दारू घशाखालीं लोटली आणि त्याबरोबर त्याच्या चेहऱ्याचा नेहमींचा पिवळा रंग परत आला. एका माणसानें त्याला विचारलें, " काय रे, तुला खरोखरीच लिहितां वाचतां येतें काय ? "

प्रश्न विचारणाऱ्याकडे कुंगनें दुर्लक्ष केलें. परंतु त्या माणसानें आपलें बोलणें पुढें चालवीत विचारलें, " जर तुला लिहितां वाचतां येत असेल तर मग तुला नुसती ' स्यू-त्सा-ई ' ची मुद्धां डिग्री मिळाली नाहीं याचें काय कारण ? "

या प्रश्नानें कुंग आय चीला दुःख झालें. त्याच्या सुरकुतलेल्या चेहऱ्याचा रंग जरा फिक्का पडला. कांहीं विचित्र व असंबद्ध शब्द व वाक्यें त्याच्या तोंडून बाहेर पडलीं. पण त्यांचा अर्थ कोणालाच समजला नाहीं. यावर सर्व लोक पुन्हां जोर-जोरांत हंसूं लागले; आणि वातावरणांत एक आनंदाची लाट येऊन गेली.

अशा वेळीं जर मी सर्वांच्याबरोबर हंसण्याखिदळण्यांत सामील झालों तर मात्र माझा मालक त्याला कांहीं हरकत घेत नसे. आपलीं गिऱ्हाइकें कोणीकडून तरी खुष रहावींत हेंच तर त्याला हवें असे. आणि म्हणून कधीं कधीं तो आपणहून कुंग-आय चीला सांगे, ' लोकांना जरा हंसव बघूं ! ' परन्तु कुंगच्या दृष्टीनें त्या लोकांच्या नादीं लागणें म्हणजे अत्यंत मूर्खपणा होता म्हणून उद्धटपणें या विनन्तीचा अव्हेर करून तो रस्त्यांत खेळणाऱ्या मुलांकडे वळे.

एके दिवशीं तो मला विचारूं लागला, " काय रे मुला, तूं कांहीं लिहायला वाचायला शिकला आहेस काय ? "

मी मानेनेंच हो म्हटलें.

" हाव्वो ! " तो म्हणाला, " अच्छा ! मी तुझी आतां परीक्षा घेतों बरं का ! ' मसालेदार सोयाबीन ' यांतील ' स ' कसा लिहिशील सांग बघूं ? "

मी विचार केला, " हा असला उडाणटप्पू मवाली माझी परीक्षा घ्यावयाच्या लायकीचा तरी आहे काय ? " आणि त्याच्याकडून तोंड फिरवून त्याच्या बोलण्या-कडे अगदींच दुर्लक्ष केलें. थोडा वेळ तो गप्प उभा राहिला. नन्तर मोठ्या सल-गीच्या स्वरांत बोलूं लागला,

" मग काय, येत नाहीं तर तुला ? अं ? ऐक मी सांगतों ! हें पहा, " मसालेदार सोयाबीन ' सारखे शब्द तुला नीट ध्यानांत ठेवले पाहिजेत. कारण तूं जेव्हां कधीं एखाद्या दुकानाचा मालक होशील तेव्हां दुकानाचा जमाखर्च वगैरे ठेवतांना अशा तऱ्हेचे शब्द माहीत असणें आवश्यक आहे. "

मी विचार केला कीं मला दुकानदार बनायला अजून कितीतरी अवकाश आहे. शिवाय मी आपल्या मालकाला जमाखर्चाच्या वहींत ' मसालेदार सोयाबीन ' लिहि-तांना अद्याप कधींच पाहिलें नव्हतें.

तरी पण दुकानदार बनण्याच्या नुसत्या कल्पनेनेंच खुष होऊन त्याची कटकट टाळ-ण्यासाठीं मी उत्तरलों,

" तुला कोण म्हणतांय् मला शिकव म्हणून ? 'सात' मधील ' सा ' प्रमाणें लिहितात तर काय ! "

कुंग आय ची एकदम खुष झाला आणि रंगांत येऊन आपल्या हातांच्या नखांनीं टेबलावर तबला वाजवूं लागला. " टॉ यॅं, टॉ यॅं ! ठीक ! पण ' सा ' हा तीन वेगवेगळ्या प्रकारांनीं लिहिला जातो. तुला ते तिन्ही प्रकार माहीत आहेत काय ? "

मला भारी राग आला त्याच्या लोचटपणाचा; आणि तोंड वेडेंवाकडें करीत मी तेथून निघून गेलों. त्यानें ' सा ' चे प्रकार काढून दाखविण्यासाठीं आपलें वाढलेलें नख दारूच्या पेल्यांत बुडविलें होतें. पण मी तिकडे कांहींच लक्ष देत नाहीं असें पाहून त्यानें नख झाडून टाकलें आणि एक दीर्घ उसासा सोडला. माझ्या वागणुकी-मुळें त्याला किती मानसिक दुःख झालें होतें हें त्याच्या डोळ्यांवरून स्पष्ट दिसत होतें.

कधीं कधीं जेव्हां तो खुषींत येऊन जोरजोरांत हसूं खिदळूं लागे तेव्हां आमच्या गुत्त्याच्या आसपास खेळत असलेलीं लहान लहान मुलें आंत येऊन त्याला घेरत. मग तो प्रत्येक मुलाला खारवलेल्या सोयाबीनची एकेक शेंग देई. मुलांना काय ? मिळालेली शेंग खाऊन आणखी मिळेल या आशेनें तीं तेथेंच घुटमळत राहात आणि अधाशी नजरेनें त्या शेंगांच्या बशीकडे पाहात. तीं अशीं घुटमळूं लागलीं म्हणजे तो कांहींसा अस्वस्थ होई आणि आपली लांब लांब बोटें बशीवर पसरून, खालीं वांकून हळूंच त्यांना म्हणे, " एवढ्याशा तर होत्या ! माझ्यासाठीं या एक दोन उरल्या आहेत. तेवढ्या खाऊं द्या ना मला ! " आणि नंतर ताठ उभा राहून तो जणूं आपल्याशींच पुटपुटूं लागे. " जास्त नाहीं. जास्त हो त्साय ! जास्त नाहीं. औहीह ! " आपले ते विचित्र शब्द तो बोलूं लागला कीं मुलें हंसत खिदळत पळून जात.

हिंवाळ्याच्या मध्याला लो चिंगला एक जत्रा भरते. अशाच एका जत्रेच्या कांहीं दिवस आधीं एके दिवशीं आमचा मालक दुकानचा जमाखर्च पुरा करीत होता. पांढरा फळा उतरतां उतरतां तो म्हणाला, " किती तरी दिवसांत दिसला नाहीं कुंग आय ची ! एकोणीस आणे येणें आहे त्याचेकडे ! "

या वेळीं कुंग आय ची बरेच दिवसांत आपल्याला दिसला नाहीं याची मला जाणीव झाली.

"येईल कसा बेटा ! खूप मार खाल्लाय् त्यानें ! या वेळीं तर दोन्ही नंगड्या मोडून टाकल्या आहेत पोलिसांनी त्याच्या ! " एका दारुड्यानें बातमी सांगितली.

" अरेरे ! " कुणीतरी चुकचुकलं.

" हो ना ! हीच चोरीची भानगड अन् काय ! बाकी तो अगदीं गाढव आहे यांत कांहीं शंका नाहीं. या वेळीं तर त्यानें प्रत्यक्ष मॅजिस्ट्रेट टिंगच्या घरावरच दरवडा घातला. अशा जागीं कां तो सुखासुखी सुटणार ! "

" पुढें काय झालं ? "

" काय व्हायचंय ! प्रथम त्याच्याकडून गुन्ह्याचा कबुली जबाब लिहून घेतला आणि मग त्याला बेदम पिटून काढलें. अगदीं मध्यरात्र होईपर्यंत मारपीट चालली होती. याच मारहाणींत त्याचे दोन्ही पाय मोडले. "

" मग ? "

" मग काय ? त्याच्या त्या नंगड्यांवर औषधोपचार तरी कोण करणार ? "

" हल्लीं त्याची काय हालहवाल ? " मालकानें विचारलें.

" कोण जाणें ! कदाचित् मेलाहि असेल. " थंडपणें उत्तर आलें.

यावर मालक कांहीं बोलला नाहीं. तो निमुटपणें हिशेब करूं लागला.

ती जत्रा संपली. राक्षसी थंडीचे अकाळविकाळ वारे दिवसेंदिवस जास्त जास्त भयानक होऊं लागले. खरा हिंवाळा येऊं लागला. मी दिवसभर धगधगत्या शेगडी-जवळ उभा असे तरीहि थंडीपासून बचाव करण्यासाठीं मला आपला कापूस भरलेला लांब कोट अखंड वापरावा लागे. अशा स्थितींत एके दिवशीं दुपारच्या वेळीं मी डोळे बन्द करून बसल्याबसल्या डुलक्या घेत होतों. दुकानांत एकहि गिऱ्हाईक नव्हतें.

" एक प्याला शराब गरम करो ! "

मी दचकून डोळे उघडले. आवाज खूप अशक्त होता, पण कानांना त्याची ओळख होती. मी चोहोंकडे नजर फेकली; पण दुकानांत कोणीहि दिसलें नाहीं. मी उभा राहिलों. आणि टेबलावरून वांकून पाहूं लागलों. तों काय ! दरवाजाकडे तोंड करून कुंग आय ची जमिनीवर बसला होता. त्याचा चेहरा अगदीं खंगलेला,

निराश आणि भयानक दिसत होता. त्यानें आपले गुडघे जमिनीवर टेकले होते. पण ते उघडे नव्हते. एका टोपलींत गवत भरून त्यांत ते गुडघे ठेवलेले होते. आणि मुंजाच्या दोरीनें ती टोपली त्याच्या खांद्याला अडकविलेली होती. मला पाहतांच त्यानें पुन्हां हळू आवाजांत सांगितलें, "एक प्याला शराब गरम करो! आमच्या मालकानेंहि आपली मान उंचावून टेबलावरून वांकून पाहिलें आणि अधीरतेनें म्हटलें, "कुंग आय ची, तुझ्या नांवें अजून एकोणीस आणे येणें आहे बरं का!"

त्यानें आपली मान मोठ्या कष्टानें वर उचलली. जणूं तिच्यांत आतां कांहींच राम उरला नव्हता. तो पुटपुटला, "तें...जाने दो! ते पैसे नंतर दिले जातील. हे घ्या. या वेळीं तर रोख आहेत. दारू जरा चांगली द्या हं!"

नेहमींप्रमाणें मालक हंसला आणि म्हणाला, "कुंग आय ची, तूं पुन्हां चोरी केलीस अं?"

त्यानें कांहीं चर्चा केली नाहीं कीं इन्कारहि केला नाहीं. थोडक्यांत उत्तर दिलें, "थट्टा राहूं द्या आतां!"

"थट्टा? जर तूं चोरी केली नाहींस तर मग मारून मारून तुझ्या या तंगड्या लोकांनीं कां बरं तोडून टाकल्या?"

"तोडून टाकल्या?" त्यानें ओढलेल्या आवाजांत म्हटलें, "मोडल्या त्या—पडण्यामुळें! पडण्यामुळें!"

त्याचे डोळे म्हणत होते, 'ही चर्चा आतां जास्त न लांबली तर बरे!'

एवढ्यांत आणखी लोक गोळा झाले. आणि सर्वजण मालकाबरोबर हसूं लागले.

मी दारू गरम करून कुंगजवळ गेलों; आणि पेला त्याच्या समोर ठेवला. खिशांतून चार आण्यांचे पैसे हुडकून त्यानें मला दिले तेव्हां मला असें दिसलें कीं त्याचे लांब लांब पंजे चिखलानें बरबटलेले आहेत. आणि मग माझ्या ध्यानांत आलें कीं तो येथपर्यंत खुरडत खुरडत आला होता. दारू कशीबशी घशांतून खालीं उतरेपर्यंतच तो तेथें थांबला, आणि मग लागलीच त्यानें आपले पाय आखडले व हातांच्या आधारानें खुरडत खुरडत तो बाहेर निघून गेला.

दुकानांतील लोक त्यांच्याविषयीं गप्पा मारीत होते. ते त्याच्याकडे पाहून थट्टेखोरपणानें हंसत होते आणि या सर्व आवाजांचा एक कोलाहल बनला होता. पण कुंगनें तिकडे मुळींच लक्ष दिलें नाहीं.

या गोष्टीला बरेच दिवस होऊन गेले. तो पुन्हां कधीं दिसला नाहीं. वर्षअखेर दुकानदारानें पांढरा फळा पाहिला आणि म्हटलें, " कुंग आय ची कडे अजूनहि ते एकोणीस आणे येणें आहेत. "

दुसऱ्या वर्षी जेव्हां उन्हाळ्यांतील जत्रा भरली तेव्हां हेंच वाक्य त्यानें पुन्हां एकदां उच्चारलें. पण जेव्हां हिवाळी जत्रेचे दिवस आले तेव्हां मात्र त्यानें याचा कांहींच उल्लेख केला नाहीं. यानंतर कुंग आय ची ला मी कधींच पाहिलें नाहीं. कदाचित् तो खरोखरीच मेला असेल.

—लोहसून—

---

: ४ :

# कुत्रा

माझें नांव मला माहीत नाहीं. ( कधीं काळीं माझें नांव तरी ठेवलं गेलं होतं कीं नाहीं कोण जाणे ! ) माझें नक्की वय काय असेल याचाहि अंदाज मला नाहीं; कारण इथें मी असाच योगायोगानें येऊन पोहोंचलों आहे. शून्यांतून उचलला गेलों आणि मागला पुढला कसलाहि विचार न करतां पृथ्वीतलावर फेकला गेलों. रस्त्यांत पडलेला एकादा दगड येणारे जाणारे सहज गम्मत म्हणून ठोकरांनें इकडे तिकडे उडवितात ना ? अगदीं तस्सेंच माझेंहि झालें असावें. माझी आई कोण होती व वडील कोण होते याचीहि मला मुळींच कल्पना नाहीं. मी फक्त एक वस्तु होतों–अशी वस्तु जिला कोणी वारस नाहीं, जिचा सर्वांनीं त्याग केला आहे, जिला सर्वजण विसरून गेले आहेत. पिंगट कातडी, काळे केस, काळे डोळे, चपटें नाक आणि लहान बांधा हें माझें शरीरवर्णन. अशाच वर्णनाचे हजारों–लाखों जीव ज्या ठिकाणीं रहात होते त्या ठिकाणीं मीहि कांहीं दिवस राहिलों आहे.

सर्वांप्रमाणें मलाहि बालपण मिळालें होतें; पण सर्वांपेक्षां अगदीं विचित्र. अगदीं वेगळें ! कुणी मजवर दया केली नाहीं, कुणी जवळ घेऊन मला प्रेमानें थोपटलें नाहीं, कुणी माझ्या सुखाची काळजी वाहिली नाहीं. माझ्या अगदीं सुरवातीच्या ज्या आठवणी आहेत त्या भुकेच्या, थंडीनें कुडकुडण्याच्या व लोकांनीं 'हड्हड्' केल्याच्या ! तरी पण मला एक हडकुळा, उंचेला, चेहऱ्यावर सुरकुत्या पडलेला म्हातारा आठवतो आहे ( कधीं तें निश्चित आठवत नाहीं, कारण वेळेचें माप असें मजजवळ नाहींच. पण एके दिवशीं असा म्हातारा भेटला होता हें मात्र नक्की ! ) तो माझ्यासमोर थांबला, आणि डोकें हालवीत उद्गारला, " या वयांत तूं शाळेंत जाऊन शिकायला हवें

होतेस. शिक्षण--माणसाला सर्वांत जास्त आवश्यक अशी हीच एक वस्तु आहे ! ” तो अगदीं हलक्या आवाजांत बोलत होता. त्या आवाजांत एक प्रकारचा मऊपणा व कनवाळूपणा प्रतीत होत होता. त्याचा चेहरा अगदीं उदासवाणा होता. त्याच्या त्या उपदेशाचा मजवर फार परिणाम झाला. आणि आपलें वैयक्तिक दुःख विसरून कुडकुडा-वयास लावणाऱ्या थंडीची मुळींच पर्वा न करतां मी मोठ्या उत्साहानें शिक्षणाच्या शोधास निघालों.

सभोंवार उंचच उंच इमारती दिसत होत्या. कांहीं अगदीं राजवाड्यासारख्या शोभिवंत होत्या तर कांहीं अगदींच सामान्य प्रतीच्या. लोकांकडून मला समजलें कीं दुसऱ्या प्रकारच्या ज्या अगदीं मामुली इमारती होत्या त्यांचें नांव 'शाळा' आणि या-शाळांतूनच माणसें शिक्षण घेत असतात. माझ्या डोक्यांत त्या म्हाताऱ्या बाबाचा उपदेश घोळत होता. यामुळें कुणाच्याहि बोलावण्याची वाट न पाहतां मोठ्या बहा-दुरीनें मी एका शाळेंत घुसलों.

“ चल, नीघ येथून ! ही जागा तुझ्यासाठीं नाहीं !--” प्रत्येक ठिकाणीं हेच शब्द ऐकायला मिळाले. यानंतर मी प्रत्येक घरांत प्रवेश करायचा प्रयत्न केला. सुंदर हवेलीपासून तों अगदीं मोडक्या तोडक्या झोपडीपर्यंत. कांहीं ठिकाणीं अगदीं कठोर चेहरे दिसले तर कांहीं ठिकाणीं कनवाळू. पण सर्वांनीं स्वागत मात्र एकाच पद्धतीनें केलें, “ चल नीघ येथून ! ”

त्यांचे हे शब्द मला फटक्याप्रमाणें झोंबत. भीतीनें व दुःखानें अर्धमेला होऊन मी आपली मान खालीं घाली; अगदीं मेल्याहून मेल्यासारखें होई मला. यावर विचार करण्याचा मी प्रयत्न करी त्या वेळीं शाळेच्या आवारांत खेळणाऱ्या मुलांच्या हंसण्या-खिदळण्याचा आवाज माझ्या कानांत घुमूं लागे.

“ मी यांच्याप्रमाणेंच एक मनुष्य आहे ना ? ” मी आपल्याशींच विचार करूं लागलों. त्यांच्या वागणुकीचा मला अत्यंत अचंबा वाटत होता. मी जसजसा विचार करूं लागलों तसतसा माझा संशय बळावत चालला. ह्या भेडसावणाऱ्या प्रश्नाचें उत्तर द्यायची जबाबदारी टाळण्याच्या इच्छेनें त्या प्रश्नाचीच मनांतून हकाल-पट्टी करण्याचा मी प्रयत्न केला. पण दर खेपेस, क्षणोक्षणीं एक व्याजोक्तिपूर्ण, टर उडविणारा आवाज माझ्या कानाशीं येऊन मला विचारूं लागे, “ मानववंशाशीं तुझा थोडा देखील संबंध असणें शक्य तरी आहे काय ? ”

एकलकोंडा जीव, निराश, निस्सहाय्य ! जगाला माझ्या अस्तित्वाची सुद्धां पर्वा नव्हती.

अखेर एका पडक्या देवळांत मी आपलें ठाण मांडलें. त्या मंदिरांत राहणाऱ्या देवाला आपल्या प्रश्नाचें उत्तर विचारावयाचें असा निश्चय करून मी रात्रीं तेथेंच मुक्काम केला. मी मनाशीं विचार केला, " देव दयाळू आहे; त्याला सर्व कांहीं समजतें. तो माझ्या प्रश्नाचें बरोबर उत्तर देईल. "

गाभाऱ्यासमोर कधीं काळीं एक पडदा टांगलेला असावा. तो कुणीतरी फाडून टाकला होता. देव बिचारा एकटा, नागडाउघडा व धुळीनें भरलेला होता. त्याची अगदीं दुर्दशा होऊं लागलेली होती. त्याचा एक हात मोडून पडला होता. मी त्याच्या समोर गुडघे टेकून प्रार्थना केलीः---

" हे कृपाळू परमेश्वरा, मी मानव आहे कीं नाहीं ?—हा प्रश्न, ही समस्या सोडविण्यास तूं मला मदत कर. "

शांत ! स्तब्ध ! ! त्याचें धुळीनें भरलेलें तोंड हललें नाहीं. त्याच्या डोळ्यांत उत्तर देण्याची चमक उत्पन्न झाली नाहीं.

अखेर मी स्वतःच निर्णय घेतलाः–" वास्तविकपणें जे माझ्याहून अगदीं उघड उघड वेगळ्या प्रकारचे आहेत त्यांच्याशीं कोठल्याहि प्रकारचा संबंध असल्याचा दावा माझ्यासारख्यानें करणें किती हास्यास्पद आहे ? " मी पुढें विचार करूं लागलों, " ऊब, आराम, मानवी भावना, मानवांचे हक्क–वगैरे सगळ्या गोष्टींची मला मनाई आहे. मी निरुपयोगी झालेल्या पदार्थांवर आपली गुजराण चालवितों. हे पदार्थ असे असतात कीं, खरोखरींचीं माणसें ते खाणें शक्य नाहीं म्हणून फेकून देतात. अशा स्थितींत मी स्वतःला मानवांपैकीं एक समजणें म्हणजे मानव्याचा अपमान करणें आहे. माणसांच्या जगाशीं माझा कांहीं एक संबंध नाहीं याबद्दल मुळींच शंका नाहीं. "

पण मध्येंच माझ्या मनांत विचार आला, " मी जरी मनुष्य नसलों तरी ज्यानें मला या जगांत आणून सोडलें त्याचा त्यांत कांहीं तरी उद्देश असेलच ना ? शिवाय माझ्या शरीराचाहि बाजार कुठेंतरी असेलच–कीं ! कारण या जगांत प्रत्येक गोष्ट विकणें आणि विकत घेणें शक्य आहे; मग माझीच खरेदी–विक्री कां अशक्य असावी ? "—असा विचार करून आपल्या पाठीवर किंमतीचें लेबल बांधून मी

मा. ९८.

स्वतःला विकण्यासाठीं म्हणून बाजारांत गेलों. मी एके ठिकाणीं उभा राहिलों. तेथून थोड्या वेळानें दुसरीकडे गेलों. आपलें डोकें व शरीर यांचें सर्व बाजूंनीं प्रदर्शन केलें आणि खरेदीदारांना माझी किंमत करायला सांगितलें. मी मनांत असा ठाम निश्चय केला होता कीं, जर खरोखरीच मला कोणी विकत घेईल आणि उरलें सुरलेलें खायला घालील तर एखादा कुत्रा जितक्या इमानीपणानें आपल्या मालकाची सेवाचाकरी करतो तितक्याच इमानेंइतबारें मी मला विकत घेणाऱ्या माणसाची सेवा करीन.

मी दिवसभर वाट पाहिली. सबंध बाजारभर इकडून तिकडे चकरा मारल्या; पण कुणी नुसता माझा भावमुद्धां विचारला नाहीं. जेथें जाई तेथें लोक थट्टेखोरपणानें पाहून फिदीफिदी हंसत. फक्त लहान मुलांनीं मजकडे थोडेसें विशेष लक्ष दिलें. अर्थात् त्यांचें लक्ष हें नुसती टिंगल करण्यापुरतेंच होतें. अखेर दमूनभागून, उपाशीं पोटीं मी देवळांत परत आलों. मी येतांना रस्त्यांतून वाळलेले व धुळीनें भरलेले भाकरीचे तुकडे गोळा करून आणले होते.त्यांवर यथेच्छ ताव मारला.माझ्या डोक्यांत विचार आला कीं, " ज्या अर्थीं मी असलें घाणेरडें अन्न खाऊं शकतों, त्या अर्थीं माझा कोठा कुत्र्याच्या कोठ्यासारखाच असला पाहिजे. ".

ईश्वराच्या त्या उजाड व वैराण घरांत अगदीं निस्तब्धता पसरलेली होती.माझ्या-शिवाय तेथें दुसरें कोणीहि नव्हतें. मी अगदीं मुडद्याप्रमाणें पडून राहिलों. जगाला माझा कांहींच उपयोग नाहीं या कल्पनेनें माझा मलाच तिटकारा आला. माझा माणसाला कांहींच उपयोग होत नाहीं हें तर उघड होतें. मी ओक्साबोक्शी रडूं लागलों, पण त्या मौल्यवान अश्रूंनींहि मज बिनजमातीच्या अभाग्याचें सांत्वन केलें नाहीं. तरीहि मी रडत राहिलों—कारण मला दुसरें कांहींच काम नव्हतें; आणि स्वतःला देण्यासारखें असें मजजवळ माझ्या अश्रूंशिवाय कांहींच नव्हतें. मी फक्त देवळांत बसूनच रडलों नाहीं तर देवळाबाहेर जाऊन व श्रीमंत लोकांच्या दारांत उभा राहूनहि मी रडून घेतलें.

एका मोठ्या घराच्या फाटकाबाहेर मी लपून बसलों. माझ्या पोटांत कावळे कोकलत होते व थंडीनें माझे हातपाय अगदीं आंखडून गेले होते. मी रडूं लागलों. मध्येंच थांबलों. आणि पुन्हां हृदयांतील दुःख हलकें करण्यासाठीं पहिल्याहून जोरजोरानें रडूं लागलों. विलायती पोषाख घातलेला एक तरुण अगदीं मजजवळून गेला आणि घरांत

शिरला. पण त्यानें मजकडे पाहिलें देखील नाहीं. त्यानंतर एक मध्यम वयाचा मनुष्य त्या घरांत गेला. पण त्याचेंहि मजकडे लक्ष गेलें नाहीं. रस्त्यावरून लोकांची ये जा सुरू होती. पण माझ्याकडे कुणी पहात देखील नव्हतें. माझें अस्तित्वच नव्हतें का तेथें ?

अखेर एक उंचा पुरा मनुष्य बाहेर आला. त्यानें मला पाहिलें हें मात्र नक्की. कारण मजजवळ येऊन त्यानें एक इरसाल शिवी हांसडली आणि खेंकसला, ' चल नीघ येथून ! ही जागा तुझ्यासाठीं नाहीं समजलास ? ' एकाद्या कुत्र्याला मारावें त्या-प्रमाणें तो मला लाथेनें मारूंहि लागला !

माझ्या डोळ्यांतून ओघळणारे अश्रु अखेर संपले. आणि दमूनभागून कसाबसा खुरडत खुरडत मी देवळांत गेलों. तेथें त्या मोडक्या मूर्तीपुढें मी पुन्हां एकदां गुडघे टेकले–ती मूर्ति माझा एकमेव मित्र होती—आणि मी पुन्हां प्रार्थना करूं लागलों :—

" हे सर्वशक्तिमान् ईश्वरा ! मी मनुष्य नाहीं हें तर उघड आहे. तरी पण देवानें मला येथें टाकलेलें आहे आणि मला या दुनियेंत रहावयाचें आहे. मी एक वाट चुकलेला अनाथ आहे. मला माझे आईबाप माहीत नाहींत.तरी पण आपल्याला 'आपलं' असं कोणी तरी असावं असं सारखं वाटत असतं. मज अनाथाला तूं आपल्या पदरांत घे. हे क्षमा करणाऱ्या न्यायाधीशा ! तूं मला आपला पुत्र मान. मानवजातीशीं माझा कसल्याहि प्रकारचा संबंध नाहीं आणि मानवी प्रेम मला कधीं कळायचेंहि नाहीं नि मिळायचेंहि नाहीं ! "

ईश्वरानें आपलें तोंड उघडलें नाहीं. पण त्यानें मला हांकलूनहि दिलें नाहीं. अशा प्रकारें अखेर मला एक बाप मिळाला–हात–तुटका, न्यायप्रिय अन् क्षमावान् !

## — २ —

पोटासाठीं भीक मागायला मला रोज बाहेर जावें लागे. जें कांहीं मिळेल तेवढें खाऊन मी ढेकर देई व उल्हासांत घरीं येई; कारण जगांत मी मुद्दां कुणीतरी आहे व मला एक बाप आहे याची मला पहिल्या प्रथम येथेंच जाणीव झाली होती. माझा

बाप अर्थातच देवळांतील देव होता. तो कधीं आपले ओठ हालवीत नसे किंवा माझ्या मनाला धीर येईल असा एखादा शब्दहि उच्चारीत नसे हें खरें; तरी पण तो तिथें नेहमीं असायचा. माझी साथ कधींहि न सोडणारी अशी तेवढीच एक व्यक्ति जगांत होती.

काळ झपाट्यानें धांवत होता व मी मोठा होत होतों. मी मनुष्य नाहीं याबद्दल माझी खात्री होऊन चुकली होती. यामुळें अखेर आपण आहोंत तरी कोण याविषयीं माझ्या मनांत खूप शंकाकुशंका निर्माण होऊं लागल्या. तरी पण कधीं कधीं मला असें वाटे कीं, मानवी भावनांचा जोर माझ्यांत खूप झालेला आहे. ताजें व स्वादिष्ट अन्न, स्वच्छ कपडे आणि एका सुंदर घरांत उबदार असें आरामशीर अंथरूण आपल्याला मिळावें अशी इच्छा माझ्या मनांत वारंवार उद्भवूं लागली. “ पण या सगळ्या मानवी इच्छा आहेत; अशा प्रकारच्या सुखसोयींचीं स्वप्नें पाहाण्याचा तुला काय अधिकार ? ” मी आपल्या मनाला सांगितलें.

तरी देवळांतील दुकानांतून मांडून ठेवलेल्या,ज्यांना पाहतांच माझ्या तोंडाला पाणी सुटे अशा पदार्थांविषयीं मी विचार करीतच राही. आणि शिवाय...हो !—स्त्रियासुद्धां माझें मन आपल्याकडे आकर्षित करून घेत. त्यांचें तें चेतोहारी मंदस्मित, मऊ मऊ व गोरेपान पाय ! ( हे पाय संगमरवराप्रमाणें गुळगुळीत परंतु मोठे उबदार असावेत असा आपला माझा अंदाज ! )— माझ्यासारखा एक तुच्छ प्राणी त्या पायांच्या स्पर्शासाठीं, त्यांच्यावर प्रेम करण्यासाठीं तळमळत असेल या गोष्टीवर तुमचा विश्वास तरी बसेल का ?

अशा प्रकारच्या जंगली इच्छा उत्पन्न झाल्या कीं, लागलीच मी त्यांना दाबून टाकी. तसा मी त्या पावलांच्या जवळहि जाई म्हणा, पण इतक्यांत आपण किती तुच्छ प्राणी आहोंत हें माझ्या ध्यानांत येई आणि मी एकदम बाजूला होई.

पण एके दिवशीं काय झालें ? अत्यंत मऊ, सुंदर आणि गोऱ्यापान पायांशेजारी एक पांढरा शुभ्र कुत्रा उभा असलेला मला दिसला. माझ्या मनांत विचार आला, “ छान ! सगळे हक्क कांहीं फक्त माणसालाच मिळालेले नाहींत. आम्हां कुत्र्यांचेहि कांहीं अधिकार आहेत म्हणायचे ! ” मला खूप हुरूप आला; आणि त्या पायांना

मिठी मारण्यासाठीं म्हणून मी जोरांत धांवलों. पण काय! मला अगदीं आश्चर्याचा धक्काच बसला. कोणीतरी माझी मानगुटी पकडली आणि धपदिशीं मला जमिनीवर आपटलें.

" पिसाळलंय् वाटतं बेटं! " त्यानें माझ्या पेकाटांत लाथ हाणीत म्हटलें.

देवळांत परत आल्यावर मी या निर्णयावर येऊन पोहोंचलों कीं, मी कुत्र्यापेक्षांहि हलक्या कोटीचा असा दुसरा एखादा प्राणी आहे. मी प्रार्थना करूं लागलोंः—

" हे बापा! ईश्वरबाप्पा!! मला खरोखरीचा कुत्रा तरी बनव. एक लहानसा पांढरा शुभ्र कुत्रा! आज रस्त्यांत जो मी पाहिला अगदीं तसला! म्हणजे मग मला माणसांच्या प्रेमांत व चैनींत सहभागी होतां येईल.

## — ३ —

पिंगट कातडी, काळे केस, काळे डोळे, चपटें नाक, ठेंगणा बांधा--वगैरे गोष्टी पुष्कळशा अस्सल माणसाप्रमाणें मजपाशींहि होत्या; पण मला असें दिसून आलें कीं या जगांत मानवजातीशीं संबंध ठेवणाऱ्यांपैकीं कांहीं असेहि आहेत कीं, ज्यांची कातडी पांढरी शुभ्र, केस पिंगट, नाक सरळ आणि बांधा धिप्पाड असतो.

मी जरा लक्षपूर्वक पाहिलें तेव्हां मला असें दिसून आलें कीं कांहीं लोक रस्त्यांतून मोठ्या ऐटीनें मिरवत जात असतात. ते गातात, आरडाओरडा करतात व हंसतात-खिदळतात. जणूं जगांत त्यांचेंच तेवढें अस्तित्व असतें. आणि मी जेव्हां असें पाहिलें कीं इतर लोक त्यांच्यापासून दूर राहूनच चालतात; त्यांच्याजवळ जाण्याची इतरांना हिम्मत होत नाहीं, तेव्हां मात्र मला मोठें आश्चर्य वाटलें. " माणसांमाणसांतहि प्रकार आहेत तर एकूण! " मी मनाशीं म्हटलें. जे लोक नेहमीं माझ्या पाहण्यांत येतात त्यांच्याहून श्रेष्ठ दर्जाचे लोकहि जगांत आहेत हा एक शोधच लागला मला. विशेष अधिकार असलेल्या या नशिबवान लोकांकडे मी मोठ्या आशाळभूतपणें पाहूं लागलों. त्यांच्यापैकीं पुष्कळसे लोक गोल पांढरी टोपी, निळ्या कांठाचे पांढरे-

शुभ्र सदरे आणि पांढरे पायजमे वापरीत व सारखे हंसत-खिदळत असत. ते * कधीं आपापसांत भांडत व कधीं पिवळट रंगाच्या माणसांच्या डोक्यांत ( सोडा-वॉटरच्या व दारूच्या ) बाटल्या मारीत. कधीं भर रस्त्यावर स्त्रियांचीं चुंबनें घेत तर कधीं त्यांना घेऊन रिक्शांत बसत. आणि मग त्या स्त्रिया त्यांच्या मांडीवर बसून आपले उघडे व मऊ मऊ पाय हलवीत.

सगळे लोक या माणसांचा खूप आदर करतात असें दिसे. प्रत्येकजण त्यांच्या वाटेंतून दूर होई. यावरून सर्व नश्वर वस्तूंत तेच श्रेष्ठ आहेत हें उघड उघड दिसून येई. त्यांच्याजवळ जाण्याचें मी अगदीं निग्रहानें टाळीत असे. कारण माझ्या-बद्दल त्यांना खात्रीनें तिरस्कार वाटला असता. परंतु एके दिवशीं सायंकाळीं मी रोजच्याप्रमाणें उपाशी व थकल्याभागल्या स्थितींत एका घराच्या वळचणीखालीं बसून आपलें घाणीनें भरलेले व रक्तानें माखलेले पंजे एकमेकांवर चोळत बसलों होतों. एकाएकीं कांहीं लोक माझ्यासमोर येऊन उभे राहिले. मी मान वर करून पाहिलें. तों काय ! मानवांतील सर्वांत उच्च जातीचे ते लोक होते, मला एकदम धडकी भरली. वेळ टळून गेली होती. आतां पळून जायलाहि वाव नव्हता. आतां आपल्या नशिबीं काय वाढून ठेवलें आहे याचा विचार करीत मी वेडपटासारखा तेथेंच बसून राहिलों. त्यांनीं माझ्या अंगावर खेंकसून मला तेथून निघून जाण्यास सांगितलें. माझ्या कमरेंत लाथा हाणल्या आणि मला ' कुतरड्या ' म्हटलें.

" कुत्रा ? यापेक्षां वाईट कांहीं नाहीं ?--त्या रात्रीं जेव्हां मी देवळांत परत गेलों तेव्हां मी त्या देवाचे-आपल्या बापाचे-आभार मानले. कारण त्या महापुरुषांनीं मला कुत्र्यापेक्षांहि नीच ठरवलें नाहीं. त्यामुळें माझा उत्साह वाढला. कारण ज्या अर्थीं त्यांनीं मला कुत्र्याहून हलक्या दर्जाचा ठरविलें नाहीं त्या अर्थीं मी कुत्र्यांना मिळणाऱ्या हक्कांचा आपोआपच हक्कदार झालों होतों ! आणि त्या दिवशीं पाहिलेल्या, आपल्या मालकिणीच्या सुंदर पायांना बिलगून चालणाऱ्या त्या गोऱ्या प्राण्याची मला पुनः एकवार आठवण झाली.

---

* विदेशी गोरे खलाशी.

कांहीं दिवसांनीं पुनः एकदां रस्त्यावरून चालणाऱ्या दोन सुंदर व नाजुक पायांकडे माझी दृष्टि गेली. माझा आनंद गगनांत मावेना. उच्च श्रेणीच्या गोऱ्या लोकांच्या दृष्टीनें माझी किंमत कुत्र्याहून थोडीसुद्धां कमी नाहीं या गोष्टीची आठवण होऊन मी माझा हक्क बजावण्यास अधीर झालों. मी धांवत जाऊन त्या पायांना बिलगलों. त्या आनंदांत मला सगळ्या जगाचा विसर पडला.

इतक्यांत माझ्या कानावर खूप जोराचा आरडाओरडा आला. मजवर जोरजोरानें प्रहार करण्यांत आले. शेंकडों हातांनीं माझी कुतरओढ केली. पण मी कशाचीहि पर्वा न करतां त्या दोन सुंदर पायांना आनंदानें चिकटून राहिलों.

जेव्हां मी डोळे उघडले तेव्हां मी एका थंडगार व अंधाऱ्या खड्ड्यांत पडलेला होतों. कसलाहि मानवी स्वर ऐकूं येत नव्हता. माझें सगळें अंग ठणकत होतें. श्वासोच्छ्वास करणेंहि मला जड जात होतें.

परमेश्वर,–बाप, न्यायाधीश, दयावंत असा तो–धुळीनें भरलेल्या स्थितींत अजून आपल्या मंदिरांत बसलेला आहे. पण आतां मी त्या हाततुटक्या मूर्तीजवळ पुनः कधींहि प्रार्थना करणार नाहीं !––

––पा चिन

---

## : ५ : स्त्री आणि क्रान्ति

२४ मे ( खूप जोराचें वादळ सुटलें आहे )

मे महिन्यांतील हा दिवस किती तापदायक आहे ! माझा जीव अगदीं गुदमरून चालला आहे. कधींहि न संपणारी भूक, कधींहि न थांबणारी मळमळ व ओकारी अन् कधींहि न संपणारा संशय व चिंता ! सारखी या कुशीवरून त्या कुशीवर लोळते आहे. मध्येंच उताणी पडून राहतें. या पलंगाच्या फळ्या दगडाहूनहि टणक आहेत; फारच टणक. यावर निजून जिवाला स्वस्थता मिळणें अगदीं अशक्यच आहे. कितीहि या कुशीवरून त्या कुशीवर झालें, कितीहि तळमळलें तरी अंगांतील हा ठणका थोडाच कमी होणार ? अशा स्थितींत पुस्तक वाचणें अशक्य आहे; व बोलायचें तरी कुणाबरोबर ? इथें कुणीच नाहीं. म्हणून आतां लिहायला बसलें आहे. तेवढेंच मन गुंतून जाईल झालें.

जेव्हांपासून चुंगला माझ्या आजाराचें खरें कारण समजलें आहे तेव्हांपासून त्याच्या कपाळावर जास्त जास्त आंठ्या पडूं लागल्या आहेत. तोंडांतून एक शब्दहि न काढतां तो आपल्या भकास डोळ्यांनीं मजकडे सारखें टक लावून पहात असतो. जेव्हां मी त्याला या त्याच्या टक लावून पाहण्याचें कारण विचारतें तेव्हां तो उडवाउडवी करण्याच्या हेतूनें उत्तर देतो, “ छे: ग ! तसं कांहीं नाहीं–खरंच कांहीं नाहीं ! तूं आपली विश्रांति घे अन् लवकर बरी हो म्हणजे झालें ! ”

निरर्थक शब्द ! माझ्यामुळें त्याला किती त्रास होत असेल याची मला पूर्ण कल्पना आहे. स्त्रीच्या गर्भाशयाला 'ऐतिहासिक आवश्यकता' ( Historical necessities ) ची किती अल्प जाणीव असते ! ते स्वतःच आपला इतिहास व आपली आवश्यकता आहे. सोप्या भाषेंत समजावून सांगितलेलें तें एक क्लिष्ट तर्कशास्त्र आहे. या वेळीं मला 'श्रीमंती आजारा' चा नजराणा दिला गेला ही निसर्गाची केवढी उदारता आहे बेरं !

मोठ्या वीरत्वपूर्ण मार्गानें या कष्टांना तोंड देण्याचें समाधानहि मला लाभूं शकत नाहीं. असहायतेच्या जुलमी हातांत सांपडल्यामुळें नाइलाजानें का होईना, मला सुव्यवस्थितपणें चाललेल्या आपल्या पार्टीलाहि या कटकटींत ओढून घ्यावें लागेल. जेव्हां एकादा नाजूक प्रसंग निर्माण होतो आणि परिस्थितीहि सर्व बाजूंनी शत्रू बनते तेव्हां एका माणसाचें संकट सगळ्या पार्टीवर भाररूप झाल्याशिवाय रहातच नाहीं. माझ्यानें माझीं रोजचीं कामें तर नीट होत नाहींतच; पण शिवाय माझ्या या निःसहाय्य स्थितीमुळें प्रत्येक व्यक्तीच्या कार्यक्रमांत अडथळे व अनियमितपणा माजून राहिला आहे. विशेषतः चुंग तर अगदीं मेटाकुटीस आला आहे. आजाऱ्याच्या पलंगाचा तो अगदीं गुलाम बनून गेला आहे. तो दाई, आचारी, नोकर—अन् भिकारी—सर्व कांहीं आहे. हल्लीं तो आपल्या कामाकडे दुर्लक्ष करूं लागला आहे. कामावर जातां तेव्हां कसा अगदीं विमनस्क असतो. अर्थात् हें सर्व अतिश्रमामुळेंच होत आहे हें काय मला दिसत नाहीं ? याचा अर्थ असा कीं आमच्या पार्टीच्या कामाची सध्यां हेळसांड होत आहे आणि हें सर्व कुणासाठीं ? माझ्याच-साठीं ! आमच्या भावी योजना व क्लृप्त्या अगदीं निश्चित व अचूक असणें अत्यंत आवश्यक आहे. माझ्या पोटांत जो एक नूतन जीव वाढत आहे त्याच्यापेक्षांहि हें काम अत्यंत आवश्यक आहे. या नव्या कटकटीबद्दल किंवा पडणाऱ्या ओझ्याबद्दल चुंग कधीं तक्रार करीत नाहीं हें खरें, पण या काळजीच्या भाराखालीं तो किती दबला गेला आहे याची मला पूर्ण कल्पना आहे.

३० मेचा दिवस जवळ येत चालला आहे. रोज सकाळीं सहा वाजतां उठून तो बाहेर जातो आणि रात्र पडल्यावर घरीं परततो. या बहुमोल दिवसांपैकीं त्याला मजसाठींहि वेळ काढावा लागतो. माझ्या आजारापायीं त्याला आपल्या मित्रांकडे

अधून मधून थोडे फार पैसेहि मागावे लागतात. मला हें सर्व माहीत आहे. मजपासून दूर राहण्यांत त्याला किती कष्ट पडतात याचीहि मला कल्पना आहे. आणि तरीहि या असहनीय दुःखामुळें मला या सर्व गोष्टींचा सारखा विसर पडतो व मी पुनः पुनः त्याच्या बेपर्वाईबद्दल त्याच्याशीं भांडत असतें.

आमचें घर शातान नदीच्या कांठीं कुंग यू ( विद्यार्थ्यांचें वसतिगृह ) च्या पद्धतीचें आहे. दक्षिणेकडील तीन खोल्यांपैकीं मधली खोली आमच्याकडे आहे. इथें एकहि खिडकी नाहीं. फक्त एक दरवाजा तेवढा आहे. या खोलींत एक पलंग, एक टेबल आणि एक खुर्ची ठेवण्यापुरतीच जागा आहे. माझ्या पलंगावरून पडल्या पडल्या टेबलापर्यंत माझा हात पोहोंचूं शकतो एवढी मात्र सोय आहे खरी !

कित्येक दिवसांत नोकरानें आमची खोली झाडलेली नाहीं. याचें कारण कदाचित् असें असेल कीं, गेल्या मार्चपासून आम्ही आमच्या जागेचें भाडें ( दरमहा बारा रुपये ! ) दिलेलें नाहीं. भिंतीला लावलेला कागद फाटून गेला आहे. आणि त्याचा एक तुकडा छतापासून खालीं लोंबकळत आहे. यामुळें वरून सारखी माती पडत असते व कोळिष्टकें खोलीभर पसरतात. वर बांबूच्या कामट्यांचा माळा आहे. त्यावरून उंदीर इकडून तिकडे धांवपळ करीत असतात. कधीं कधीं त्यांच्यापैकीं एकादा उंदीर खालीं जमिनीवर आदळतो व राम म्हणतो. चुंग परत येईपर्यंत तो त्याच ठिकाणीं तसाच पडून राहतो. कारण मला स्वतःला उठतांच येत नाहीं. त्याच्याकडे पाहून व त्याच्या घाणीनें मला कितीहि का मळमळेना; मी कांहीं करूं शकत नाहीं.

उघड्या दरवाजांतून धूळ आंत येते आणि सगळ्या वस्तूंवर पसरते. दरवाजा नेहमींच सताड उघडा असतो. अंगणांतून जाणारा येणारा कोणीहि खोलींत डोकावूं शकतो. कोळी आपलें काम अहोरात्र करीत असतात. उन्हामध्यें चांदीप्रमाणें चकाकणारे धागे विणत विणत ते अगदीं माझ्या पलंगापर्यंत येतात. इतर जगाचें भान विसरून मी त्यांच्या त्या कामाकडे पहात असतें. " निदान हे तरी जिवंत आहेत ना ? सध्यां हेच माझे मित्र म्हणावयाचे ! "—अशा प्रकारचे विचार माझ्या डोक्यांत घोळूं लागतात. मे महिन्याच्या या विषण्ण दिवसांतील त्रासदायक एकलकोंडेपणा आणि मनस्ताप थोडा वेळ विसरून जाण्यास हे मला मदत करीत असतात.

आमच्या डाव्या बाजूचा शेजारी हा एक पी. ना. ( पेकिंगचें राष्ट्रीय विद्यापीठ )चा विद्यार्थी आहे. घरमालकाशीं याचें कायसें नातें आहे.व म्हणूनच कदाचित् त्यानें कित्येक महिन्यांत भाड्याची एक पैहि दिलेली नाहीं. यामुळें घरमालकानें आतां त्याचें टपाल जप्त करण्यास सुरवात केली आहे. विशेषतः रजिस्टर्ड पत्रें. कारण त्यांतून अधूनमधून त्याचे पैसे येत असतात. तो विद्यार्थीहि यावद्दल कधीं तक्रार करीत नाहीं. त्याला पैशाला काय तोटा ? त्याच्या फुगीर लाल चेहऱ्यावर एक प्रकारची समाधानाची व आत्मविश्वासाची छटा दिसून येते. जेव्हां त्याला पैशाची जरूर पडते तेव्हां तो घरमालकाकडून पैसे काढण्याची खटपट करतो. मालक खुशींत असला तर देतो चार दोन आणे. तेवढेंच खिशांत टाकून तो बाहेर पडतो व दारूची बाटली नि भाजलेल्या कोंबडीच्या पिलाचा एखादा तुकडा खरेदी करून लागलींच परत येतो; आणि दारें वगैरे बंद करून त्यावर यथेच्छ ताव मारतो. दिवसभर दारू ढोसत असतो व तमाशांतील अश्लील व घाणेरडीं गाणीं बडबडत असतो. जेव्हां दारूचा शेवटचा थेंबहि खलास होतो तेव्हां तो जोरजोरांत मांड्या ठोकून षड्डू मारण्याचा आविर्भाव करतो व जमिनीवर लोळूं लागतो. थोड्याच वेळांत त्याच्या इतर सर्व क्रिया बंद होतात आणि त्याचें मोठमोठ्यानें घोरणें ऐकूं येऊं लागतें. कधीं कधीं त्याला एक कवडीसुद्धां मिळत नाहीं. उलट कठोर निर्भर्त्सना ऐकावी लागते, आणि चारदोन उपदेशाचे कडू घोटहि गळ्याखालीं उतरवावे लागतात. अशा वेळीं तो अगदीं निराश होऊन खोलींत जातो. आणि स्वतःशींच पुटपुटतो, " अरेरे ! छेः छेः ! ! हं ऽ ऽ ! ! ! " या वेळीं तो खरोखरीच आत्महत्या करूं इच्छित असेल काय ? कोण जाणे ? त्याच्याबद्दल कुणी विशेष फिकीर मात्र करीत नाहीं आणि घरमालक तर तिकडे पूर्ण दुर्लक्षच करतो.

आमच्या खोलीच्या दुसऱ्या बाजूस एक नाटकें लिहिणारा राहतो. हाहि राष्ट्रीय विद्यापीठाचा विद्यार्थी आहे. तो बहुतेक सर्व दिवसभर कुठेंतरी गडप झालेला असतो. बाकी त्याबद्दल त्याचे आभारच मानले पाहिजेत म्हणा ! कारण जेव्हां तो आपल्या खोलींत असतो तेव्हां तो आपल्या धंद्याची तालीम करींत असतो. आणि हें आम्हांला अगदीं त्रासदायक होतें. तो जेव्हां नटांचें ॲक्टिंग करतां तेव्हां वेडाकाच्या डरॉव डरॉवच्या सुरांत गाऊं लागतो; व अधूनमधून ओबडधोबड व भसाड्या आवाजांत पाठ केलेलें भाषण म्हणूं लागतो. पण जेव्हां तो स्वतःचा गळा आवळून

वायकांप्रमाणें वारीक व कोमल आवाज काढण्याचा प्रयत्न करतो तेव्हां मात्र अगदीं शहारे येतात. गाण्याच्या बरोबर तो जे हावभाव करतो–माना वेळावतो, कंबरेत ठुमकतो–त्याचें चित्र कल्पनेनें सहज डोळ्यांसमोर उभें राहूं शकतें. घरमालकाला चहाचें व गप्पा मारण्याचें आमंत्रण देणें हा त्याचा नेहमीचा व्यवसाय. त्या वेळीं त्या मेल्या घरमालकावरोवर हाहि इतर भाडेकरूंच्या नांवानें खडे फोडीत असतो.

" अरे हो ! " तो म्हणतो, " मला देखील भाडं द्यायचं आहे नाहीं का ? आज सकाळींच आठवण झाली होती कीं आज बँकेंत गेलें पाहिजे. पण माझी स्मरणशक्तीच बेटी कमकुवत झालीय्. पुन्हां आपला विसरलों. खोटं वाटत असेल तर हें पहा, बँकेचें चेकबुक माझ्या खिशांतच आहे. सांगतों काय तर, अहो, मला खरोखरीच बँकेंत जायचं होतं ! "

हा नाटक्या माणूस घरच्या गड्यालाहि फितवून ठेवतो. त्याला मूठभर शेंगदाणे देऊन व गोडगोड बोलून त्याच्याकडून हा तऱ्हेतऱ्हेची माहिति काढून घेतो:– रिक्शावाल्याच्या बायकोनें ( घराच्या पश्चिमेकडील बाजूस एका खोपटांत राहते ती ). आपल्या नवऱ्याच्या न कळत किती पैसे जमवून ठेवले आहेत ? रात्रीं त्या नटीच्या खोलींत कोण झोंपला होता ?–त्यावेळीं तिनें कसला पोषाख केला होता ? वगैरे वगैरे ! त्याच्या गप्पा इतक्या घाणेरड्या असतात कीं, ऐकणाऱ्याचे कान विटून जावेत. मला भारी राग येतो त्यांचा. अर्थात् त्या दोघांना त्यांतच मजा वाटत असते म्हणा !

माझ्या अस्तित्वाची त्याला फारशी जाणीवच नसते. पण जेव्हां मी जोरांत ओकाऱ्या देतें तेव्हां तो मोठ्यानें उसासा सोडतो व स्वतःशींच म्हणतो, " किती असह्नीय आहे हें ! यापेक्षां मेलेलें फार बरें ! " पण अशा प्रकारें स्वगत बोलून व दुःख प्रदर्शित करून त्याच्या मनाचें समाधान होत नाहीं तेव्हां मधल्या अरुंद भिंतीवर तो ' ठक ठक ' करतो आणि फटीजवळ तोंड आणून मोठ्या सहानुभूतिपूर्ण आवाजांत हळूं हळूं म्हणतो, " बाई ! ताई ! तुम्हांला मदत करण्याची संधि देऊन तुम्ही मला उपकृत कराल काय ? तसें कराल तर माझ्या मनास फार समाधान वाटेल. तुमचे हाल पाहून माझं अन्तःकरण कसं तिळतिळ तुटतंय् ! अरेरे !! "–

त्याच्याबद्दल मला कितीहि तिरस्कार वाटत असला तरी मी तोंडांतून ब्रहि काढीत नाहीं. मी कांहींच बोलत नाहीं असें पाहून तो भयंकर रागावतो आणि मग अगदीं अचकट विचकट शिव्या द्यायला लागतो. मी जणूं त्याच्या मार्गांतील धोंडच आहे! भिंतींतील फटी बंद करण्यासाठीं त्यांवर आम्ही कागद चिकटवितों. पण तो बदमाष चाकूनें तो कागद फाडून टाकतो. शेजारी किती चांगले असतात! त्यांच्याशीं अगदीं स्वतःप्रमाणेंच वागलें पाहिजे; नाहीं का?"

अंगणांतून भांडणाची आरडाओरड ऐकूं येऊं लागली आहे. या बायका सदासर्वकाळ आपापसांत भांडत असतात. नुसतीं एकमेकींचीं उणींच काढतात असें नव्हे तर अगदीं घाणेरड्या शिव्याहि देतात; व एकमेकींच्या झिंज्या पकडून प्रत्यक्ष युद्धहि करतात.

कुणीतरी हेल काढून मोठमोठ्यानें धार्मिक मंत्र म्हणतो आहे तर कुणी शाळकरी मुलांप्रमाणें जोरजोरांत पोथ्यापुराणें वाचतो आहे. आठ वेगवेगळ्या पद्धतींचीं बिऱ्हाडें या बारा खोल्यांतून रहात आहेत. दिवसभर भयंकर गोंगाट व गडबड माजून राहिलेली असते. याबाबतींत प्रत्येकजण दुसऱ्यापेक्षां कांकणभर जास्तच वरचढ ठरण्याचा प्रयत्न करीत असतो. दिवसभर या अंगणाला जणूं उकळ्या फुटत असतात. फक्त माझ्या या छोट्याशा कोंदट खोलींत मात्र अगदीं शांत असतें. कन्फ्यूशियस माझें रक्षण करो!—मला आळीपाळीनें ताप व थंडी यांच्या हल्ल्यांना तोंड द्यावें लागत आहे. कित्येक दिवसांपासून मी अर्धपोटीं आहे. जितकी उपाशी असेन तितकी मळमळ जास्त वाढते. या भुकेच्या आणि ओकारीच्या तडाख्यांतून सुटावें म्हटलें तर घरांत भाकरीचा एक तुकडाहि नाहीं. आणि हा सगळा त्रास कशासाठीं? उगीचच! खरोखर, दोन महिन्यांहून जास्त दिवस होऊन गेले. अगदीं सहन होत नाहीं आतां! आणि तरीहि मी जगण्याची इच्छा बाळगते आहे. ज्यांत अत्यंत निर्दयपणें रसायनशास्त्राच्या जादूचा प्रयोग होत आहे असें एक भांडें मी बनल आहे, माझ्याच शरीरांत हें सर्व होत आहे.--- अन् माझ्या इच्छेविरुद्ध!

खरंच, मला वेड तर नाहीं ना लागलं? या त्रासांतून सुटण्याचा हा काय मार्ग म्हणायचा? पण काय करूं? याशिवाय दुसरा मार्गच नाहीं! तरी पण या प्रश्नावर आजच मी आपलें डोकें खर्च करूं इच्छित नाहीं.

अनुक्रम २५८०७ ... ग्रं. वि. २९.५.५५

## २५ मे

काल रात्रीं चुंग बाहेरून परत आला तेव्हां त्याचा चेहरा अगदीं उतरला होता. खोलींत येतांच त्यानें अंथरुणावर धाडदिशीं अंग टाकलें. अगदीं खंगलेला दिसत होता बिचारा. त्याचे काळेभोर डोळे उन्हाळ्यांतील विहिरीप्रमाणें सुकलेले व खोलखोल गेल्यासारखे दिसत होते. भावी संकटाची भीति त्याच्या डोळ्यांतून स्पष्टपणें दृग्गोचर होत होती.

त्यानें मजकडे भकास नजरेनें पाहिलें. मी जेव्हां हडसून खडसून विचारलें तेव्हां त्यानें कबूल केलें कीं, दुपारपासून त्याच्या पोटांत अन्नाचा एक कणहि गेलेला नव्हता. येतांना त्यानें एका भडभुंजाकडून सहा वाळलेल्या शिळ्या भाकरी विकत आणल्या होत्या.

मोठ्या कष्टानें तो अंथरुणावरून उठला. कसावसा स्टोव्ह पेटवला आणि त्यावर पाणी ठेवलें. जेव्हां पाणी उकळूं लागलें तेव्हां त्यानें त्यांत त्याबरोबर आणलेल्या वाळलेल्या भाकरी टाकल्या. इतकें होईपर्यंत त्यानें तोंडांतून एक चकार शब्दहि काढला नाहीं. नंतर भिंतीच्या फटींना कान लावून शेजारींपाजारीं झोपीं गेले आहेत याची त्यानें खात्री करून घेतली आणि मग हळूं हळूं बोलूं लागलाः—

" आतां लवकरच आपल्याला ही जागा सोडावी लागणार ! तूं अशी आजारी असतांना अशा प्रकारचें बोलणें काढण्याचा प्रसंग येणें हा खरोखरी अगदीं जुलूम आहे. तरी पण..."

इतकें बोलून तो थांबला व मजकडे प्रश्नार्थक मुद्रेनें पाहूं लागला. पण मी मानेनेंच विचारलें, " ही सगळी भानगड आहे तरी काय ? "

" हीच रोजची घरमालकाची कटकट ! त्यानें बेट्यानें पुन्हां सतावायला सुरवात केलीय्. म्हणतोय् कीं, भाडें तरी द्या नाहींतर जागा तरी खाली करा; नाहीं-तर पोलिसच्या हवालीं करतों. "

मी कांहींच बोललें नाहीं, चुंगनें मला खरीखरी हकीकत सांगितलेली नाहीं याची मला पूर्ण कल्पना होती. नुसत्या भाड्याच्या प्रश्नावर इतकी आणीबाणीची परिस्थिति निर्माण होणें शक्यच नव्हतें. कारण भाड्याचें हें घोंगडें कित्येक महिन्यांपासून भिजत पडलें होतें. तेव्हां एवढ्याच एका गोष्टीमुळें तो घाबरून जाईल हें मला मुळींच शक्य वाटत नव्हतें. निदान या बाबतींत तो इतका बेचैन तरी खात्रीनें

दिसला नसता. तो मजपासून कांहींतरी लपवून ठेवीत होता निश्चित हें; पण मी त्याची उलटतपासणी घेतली नाहीं. कारण माझ्या कानावर कोणती गोष्ट पडूं नये याचें ज्ञान मजपेक्षां त्यालाच जास्त होतें.

कांहींहि असो. येथून हलावें हें लागणारच. पण हलायचें तरी कसें ? सर्वांत मुख्य अडचण म्हणजे पैशाची. शिवाय माझी तब्येत ही अशी तोळामासा !

" आणखी थोडे दिवस आपल्याला येथें नाहीं का राहतां यायचें ? " अखेर मी विचारलें,

" हो ! हो ! ! येईल ना ! काय हरकत आहे ?......पण हें पहा, ३० मे पूर्वी आपल्याला येथून हलणें भाग आहे. तरी पण तूं कांहीं काळजी करूं नकोस. आतां तुला एवढ्यासाठींच सांगितलें कीं ऐनवेळीं तूं घाबरून जाऊं नयेस. तशी कांहीं विशेष महत्त्वाची गोष्ट नाहीं ही. अन् हें पहा, मला आतां लवकरच कांहीं रुपये मिळणार आहेत. " इतकें बोलून तो किंचित् हंसला. पण त्याच्या डोळ्यांतील भकासपणा मात्र जसाच्या तसाच कायम होता. यामुळें त्याचें तें हास्य मोठें भेसूर वाटलें. थोडा वेळ थांबून तो म्हणाला, " हवापालट केल्यानें तुझ्या प्रकृतीस आराम वाटेल नाहीं ? "

त्यानें स्टोव्ह विझवला आणि उकडलेल्या भाकरी बाहेर काढल्या. माझ्या अंथरुणावर बसून तो मला भरवूं लागला. आमचें अर्धे जेवण झालें असेल किंवा नसेल इतक्यांत माझ्या आंतड्यांनीं बंड पुकारलें व पोटांत गेलेलें सर्वच्या सर्व बाहेर आलें. नुसतें अन्नच नव्हे, तर मला असें वाटूं लागलें कीं माझे प्राणहि तोंडावाटे बाहेर पडूं पहात आहेत. इतका भयंकर प्रलय सगळ्या शरीरांत सुरू झाला. माझे डोळे हे एखाद्या घराचे दरवाजे आहेत व त्यांच्यावर आंतल्या बाजूनें घणाचे प्रहार होत आहेत असा मला भास होऊं लागला. माझ्या डोक्यांत तर जणूं आगीचा डोंबच उसळला होता. माझा माझ्या स्वतःवर मुळींच ताबा उरला नाहीं. माझें सगळें शरीर घामानें निथळत होतें आणि मी थंडीनें कुडकुडत होतें.

चुंगहि माझ्याप्रमाणेंच गडबडून गेला. तो पिसाटाप्रमाणें उगीचच इकडे तिकडे धांवपळ करीत होता. आणि तरीहि आपण हिच्या वेदना कमी करूं शकत नाहीं याबद्दल तो स्वतःवर चरफडत होता. प्रथम त्यानें मला धरून ठेवण्याचा प्रयत्न केला.

केला. नंतर माझें तोंड व नाक धुतलें, डोळे पुसले आणि कढत पाण्यांत फडकें बुडवून तें माझ्या कपाळावर ठेवलें. हीं सगळीं कामें एकट्यानें व एकाच वेळीं करण्याच्या त्याच्या प्रयत्नांत त्याचे दोन्ही हात व दोन्ही पाय फारशी मदत करूं शकत नव्हते.

रात्रभर मला झोंप लागली नाहीं. डोळे सुद्धां मिटतां येईनात. या घटनेनंतर त्या "आशाकिरणां" संबंधीं एकसारखा विचार करीत होतें. आणि त्यांतून मुक्त होण्याचा हाच एक मार्ग सांपडला. मी अत्यंत अस्वस्थ मनःस्थितींत असली पाहिजे. कारण मी आपलें पोट कुसकरत होतें, दाबत होतें व त्यावर जोरजोरानें बुक्क्या मारीत होतें असें मला साधारण अठवतें. तो "आशाकिरण" तो लहानसा जीव मरून जावा, नष्ट व्हावा अशी माझी मनापासून इच्छा होती. परन्तु माझं हृदय मात्र आपलें उरलें-सुरलें शक्तिसर्वस्व पणाला लावून माझी ही इच्छा हाणून पाडण्याचा प्रयत्न करीत होतें. मी करीत असलेल्या प्रत्येक घावाबरोबर माझें हृदय कसें विदीर्ण होत होतें. त्या वेळीं मजवर दोन भावनांचा पगडा बसलेला होता. एक आपल्या पोटच्या पोराला वांचविण्याची स्वार्थी अभिलाषा व दुसरी इतरांच्या सुखासाठीं स्वतःचा जीव वांचविण्याची निःस्वार्थी कल्पना—थोडा वेळ तर मला असें वाटूं लागलें कीं आमच्या दोघांच्या मृत्यूनेंच सर्व कांहीं सुरळीत होऊन जाईल ! किती वेडी कल्पना ही !

आणि तरी सुद्धां या चिमुकल्या जीवावर माझं फार प्रेम आहे ! याच्यामुळें मला इतक्या यातना सोसाव्या लागत आहेत खऱ्या; पण तरीहि ज्या वेळीं एक छोटासा जीव बहादुराप्रमाणें माझ्या शरीरांतून विशाल जगतावर अवतरेल त्या घडीची मी प्रतीक्षा करीत आहे. तो प्रसंग किती मजेशीर व सुखदायक असेल याची कल्पना चित्रें रंगविण्यांत माझे तासचे तास निघून जातात. अन् मला त्याची जरूरहि आहे. खऱ्या प्रतिभासंपन्न कवीला जशी एखादी अमर कविता लिहिण्याची आवश्यकता असते ना ? पण छेः ! माझ्या आवश्यकतेची कल्पना एवढ्यावरून नाहीं यायची. याहून कितीतरी जास्त जरूर आहे मला. कारण माझा बाळ वर्तमान परिस्थितींत बदल घडवून आणील, एका मोठ्या क्रान्तीचा तो सूत्रधार बनेल याबद्दल माझी खात्री आहे. आज हळूं हळूं तो एक मर्द पुरुष बनत आहे. याबद्दल मला जितकी खात्री वाटत आहे तितकीच तो पुढें मोठा क्रान्तिकारक होणार याबद्दलहि ती वाटत आहे. हा इवलासा पुरुष प्रथम प्रथम अगदीं अपंग असेल;

क्षणोक्षणीं त्याला माझ्या अस्तित्वाची गरज भासेल. त्याचे इवलाले बारीक डोळे जेव्हां हळू हळू उघडतील तेव्हां माझें हृदय कसें आनंदानें नाचूं लागेल! हा लहानसा मर्द कांहीं दिवसांनीं उठून उभा राहील आणि आपल्या अनुपम सौंदर्यानें व असामान्य सामर्थ्यानें जनतेला भारून टाकून मानवांविषयीं व एकूण परिस्थिती-विषयीं इतक्या अधिकारवाणीनें बोलूं लागेल कीं जगांतील सगळ्या सत्ताधाऱ्यांना, पृथ्वीवरील व स्वर्गांतील एकूण एक राज्यकर्त्यांना त्याच्या इच्छेपुढें मान तुकवावी लागेल. त्याच्याविरुद्ध ब्र काढण्याची कुणाचीहि छाती होणार नाहीं.

माझी मासिक पाळी जेव्हां पहिल्या प्रथम चुकली—जेव्हां माझ्या ओटीपोटांत पहिल्या प्रथम चलविचल झाली तेव्हांपासून एका विचित्र उत्कंठेनें माझा उर असा कांहीं धडधडूं लागला आहे कीं सांगतां सोय नाहीं. ही वातमी साऱ्या जगाला ऐक-वावी—अगदीं असेल नसेल तेवढी शक्ति एकवटून ओरडून सांगावी—असें वाटूं लागलें आहे. हें सांगण्यासाठीं माझी जीभ कशी फुरफुरते आहे. याचें पावित्र्य व महत्त्व हीं थोडा वेळ बाजूला ठेवलीं तरी हा लहानगा मनुष्य सर्वांत आधीं मज-कडेच पाहून खुदकन हंसेल, ' आई ' म्हणून मलाच हांक मारील या कल्पनेनें सारें शरीर कसें रोमांचित होत आहे! हो! हें सर्व कांहीं होईल, शिवाय या नव्या जीवाच्या आगमनामुळें माझा आनंद, माझी शक्ति, माझ्या महत्त्वाकांक्षा, किती-तरी वाढणार आहेत.

अशा तऱ्हेच्या कल्पना—साम्राज्यांत जी जगाला विसरून जाणार नाहीं अशी कणखर अन्तःकरणाची स्त्री जगांत एक तरी असेल काय? छेः! मुळींच असणार नाहीं. निदान मी तरी तशी नाहीं:—छेः! कुणीच असणार नाहीं! आणि तरीहि अशा हजारों लाखों बाया आज जगाच्या पाठीवर आहेत कीं, ज्यांना अशा प्रकारच्या कल्पनासाम्राज्यांत आपलें मन रमविणें परवडत नाहीं, जगाचें नागडें उघडें स्वरूप त्यांना हवेंत सुद्धां मनोरे बांधूं देत नाहीं. म्हणून मी म्हणतें कीं, ममतेचें वास्तविक स्वरूप पुष्कळशा स्त्रियांच्या संघटनेनें भक्कम होईल व त्यामुळें वैयक्तिक स्वार्थाच्या लहान लहान फायद्यांवर पाणी सोडण्यास आमचें मन प्रवृत्त होईल. नाहीं का? चालू परिस्थितीच्या पोटीं जन्म घेऊं पाहणाऱ्या नव्या क्रान्तितत्त्वाचें संगोपन करण्याची जबाबदारी आम्हां स्त्रियांवरच नाहीं का? आमच्या नैसर्गिक गुणांचा उपयोग या कार्याकडे करणें आम्हांला कां बरें शक्य होऊं नये?

तसें आम्ही करूं शकूं यावद्दल माझी खात्री आहे. परंतु या काल्पनिक तत्त्व-ज्ञानाला एका विषारी सुईत परिवर्तित करून आपल्या पोटांत भोसकून घेणें ही गोष्ट वेगळी ! या सगळ्या भावना एकमेकींशीं अविरतपणें लढत आहेत. माझ्या डोळ्यांत विचारांचा अगदीं सावळागोंधळ माजून राहिला आहे. शारीरिक यातनाहि अगदीं असह्य होऊं लागल्या आहेत. तरी पण मी आतां निश्चय केला आहे. वर्षानुवर्षांच्या राक्षसी झोपेंतून मी आतां जागी झालें आहे. पहिल्या प्रथम जेव्हां मी क्रान्तींत भाग घेण्याचें ठरविलें त्या वेळीं माझ्यांत जितकी जागृति होती त्यापेक्षां कितीतरी जास्त जागृति आतां माझ्या ठिकाणीं झाली आहे. मनुष्याच्या डोक्यांत क्रान्तीचे विचार केव्हां घोळूं लागतात ? जेव्हां त्याच्या जीवनांतील धडपड इतकी जोरजोरांत सुरू होते कीं त्यापुढें जाणें म्हणजे विनाशाला कवटाळणें असतें, जेव्हां नशीब परस्परविरुद्ध महत्त्वाकांक्षांमध्यें निवड करण्यासाठीं अंतःकरणांत अशांतता निर्माण करतें, ( मजजवळ सध्यां एक बेफिकीर व आंधळा पांगळा असा जंतु आहे. तो मोठीं विचित्र वैशिष्ट्यें घेऊन माझ्या शरीरांत प्रविष्ट झाला आहे.तरी पण तो म्हणजे तरी नशिबाचेंच एक स्वरूप नव्हे काय ? ) जेव्हां एकादा निर्णय घेतांना माणसाला आपल्या वैयक्तिक आवडीनिवडी बाजूला साराव्या लागतात. तेव्हांच माणसाच्या डोक्यांत क्रान्तिकारी विचार धुमाकूळ घालूं लागतात.

सांगायचें तात्पर्य एवढेंच कीं,आजच्या या अव्यवस्थित समाजांत लाखों गरीब माणसें डझनावारी मुलांना जन्म देत राहतील तर त्यामुळें दुःखी लोकांच्या संख्येंत भर पडण्यावांचून दुसरा कांहींच फायदा होणार नाहीं. आजारी, उपाशी व असहाय्य अशा आईच्या पोटीं जन्मास येणारें प्रत्येक मूल आपल्यावरोबर अपमान व यातना घेऊन येत असतें. गरिबींत जन्मास आलेल्या मुलाच्या नशिबीं उपासमार, अपमान, अज्ञान, अपशब्द आणि कठोरता !! शिवाय दुसरें तें काय येणार ? मनुष्य व पशू यांच्यांतील भेद दर्शविणारी जी आत्मिक उन्नति तिचें तर नांवच नको. आम्हांला परिचित असलेल्या जीवनांत आमूलाग्र परिवर्तन कसें घडवून आणाव-याचें ही समस्या आज आमच्यासमोर उभी आहे. ही समस्या आमची आम्हीच सोडविली पाहिजे. भावी पिढीवर हिचें ओझें पडणार नाहीं याची खबरदारी आम्हीच घेतली पाहिजे.

तरी पण आई बनण्याच्या कल्पनेनें माझ्या अन्तःकरणाला आंतल्या आंत गुद-गुल्या होत आहेत. अजूनही कधीं कधीं माझ्या मनांत असा विचार येतो कीं, या नव्या चिमुकल्या जीवाला जगांत आणून सोडावें आणि आपण जीवन्मुक्त व्हावें.

चुंग आज एका कोरियन मित्राला भेटेल. त्या मित्राच्या मदतीनें माझी इच्छा पूर्ण होणार आहे. त्याला शोधून काढायला मीच चुंगला सांगितलें. माझ्या त्या सांगण्यानें त्याला धक्का बसेल याची मला कल्पनाहि नव्हती. म्हणून तो जेव्हां विचित्र नजरेनें मजकडे पाहूं लागला व मुकाट्यानें घुम्यासारखा उभा राहिला तेव्हां मला त्याची भीतीच वाटली. थोडा वेळ आपल्या कोटाच्या खिशांत हात घालून तो तसाच उभा राहिला. व नंतर नकारदर्शक मान हलवून, निश्चयपूर्ण स्वरांत उद्गारला, " गर्भ--पात ? शीः ! असली कल्पना मनांतहि आणतां कामा नये ! छेः ! हें कालत्रयींहि होणें शक्य नाहीं ! "

" असं काय वरं करतोस वेड्यासारखं ? यांतून सुटका होण्याचा फक्त हाच एक मार्ग आहे. माझा अगदीं ठाम निश्चय झालाय् ! "

त्यानें मान वर करून मोठ्या विचित्र नजरेनें मजकडे पाहिलें. माझ्या त्या बोल-ण्यानें त्याच्यावर जणूं वज्रप्रहारच झाला होता ! तो माझ्या बिछान्यावर बसला. आणि माझा हात आपल्या हातीं घेऊन माझ्याकडे निरखून पाहूं लागला. त्याच्या त्या अर्थपूर्ण दृष्टींत कांहींसें दुःख व कांहींसा रुसवा होता. मी त्या निर्णयावर कशी येऊन पोहोंचलें हें मी त्याला समजावून सांगूं लागलें.

"आपल्याला नाहीं असं करतां यायचं!", तो मध्येंच म्हणाला व आपल्या हातांनीं माझें तोंड बंद करून माझ्या कानाशीं तोंड आणून कुजबुजला, " लाडके, तुला काय वाटत असेल याची मला पूर्ण कल्पना आहे. पण मागून तुला पश्चात्ताप होईल. शिवाय या मार्गानें जाण्यांत धोकाहि बराच आहे. "

त्यानें नकारदर्शक मान डोलावली व थोडा वेळ गुपचुप बसून राहिला. मलाहि एकाएकीं कसेसेंच होऊं लागलें व म्हणून मीहि पडून राहिलें.

अशा स्थितींत बराच वेळ गेल्यावर तो पुन्हां हळूंहळूं बोलूं लागला, " कितीही यातना होवोत—शारीरिक व मानसिक दोन्ही प्रकारच्या यातना—तरी पण या मार्गानें जाण्याइतपत परिस्थिति खात्रीनें बिघडलेली नाहीं. हा मार्ग किती भयंकर आ

याची कल्पना नाहीं तुला ! एक तर ' लावली ' ला यांत धोका आहे, दुसरें म्हणजे तुझ्या ज़िवालाही यांत धोका आहे. आणि तिसरें म्हणजे हें सर्व करायला आतां आपल्याला सवडही नाहीं. आपल्याला येथून शक्य तितक्या लवकर हलावयाचें आहे ! " त्याचा गळा भरून आला; यामुळें तो पुढें बोलूं शकला नाहीं. आम्ही दोघे खिन्नपणानें एकमेकांकडे टक लावून पहात राहिलों.

त्याच वेळीं भिंतीवर ओरखडे काढल्याचा आवाज आमच्या कानीं पडला. चुंगनें अर्थपूर्ण दृष्टीनें भिंतीच्या फटींकडे पाहिलें आणि प्रेमानें माझा दंड थोपटून तो बाहेर निघून गेला.

## २६ मे

काय ? सबंध रात्रींतून चुंगला एकदांहि घरीं येतां आलें नाहीं ? माझ्याकडे त्यानें दुर्लक्ष करावें अशी माझी स्थिति आहे तरी काय ? अखेर मी असं केलंय् तरी काय कीं ज्यासाठीं अशी नाजूक तब्येत असतांना मला इथें विव्हळत, अस्वस्थपणें व असहाय्य स्थितींत पडून रहावें लागावें ? इथें धीर द्यायला कोणी नाहीं. माझ्या सभोंवार एकलेपणाची जी भयंकर आग पसरलेली आहे तिच्यापासून मला वांचवूं शकेल अशी एकहि वस्तु इथें नाहीं. मोडकातोडका व जुनापुराणा तो हुक्का, आमटीचे शिंतोडे उडालेले ते कागद, भाजीचीं तीं सडलेलीं पानें आणि कोळिष्टकानें भरलेलें तें छत असं वाटतं कीं ही खोली म्हणजे निरुपयोगी, अडगळीचें सामान टाकण्याची जागा आहे.

एखाद्या बेवारशी प्रेताप्रमाणें मी येथें टाकलें गेलें आहे. अशा या स्थितींत माझा स्वाभिमान आणि अस्मिता यांच्यावर किती जोरांत आघात होत असतील याची कल्पनाच केलेली बरी. जेव्हां मी कार्यकर्त्या स्त्रीपुरुषांसमवेत कामांत गुंतलेली असते तेव्हां मला स्वतःबद्दल जसा आत्मविश्वास वाटत असतो तसा आत्मविश्वास सद्यःस्थितींत वाटणें शक्य तरी आहे काय ? एका मोठ्या समाजाचा मी एक महत्त्वाचा घटक आहे ही गोष्टहि मी आतां विसरून जाऊं लागलें आहे.

सर्वसाधारणपणें कितीहि काम असलें तरी चुंगची रात्रींतून एक तरी खेप झाल्याशिवाय राहात नाहीं. मग कालच असें काय घडलें असेल बरें ? मध्यरात्र उलटून

गेल्यानंतर त्याच्या पावलांची चाहूल ऐकण्यासाठीं मी अधीरपणें पडलें होतें. घरमालकाच्या घड्याळांत अकराचे ठोके पडल्यापासून मी टक लावून दरवाजाकडे पहात होतें. त्यानंतर दर अर्ध्या तासागणिक पडणारे ठोके मी मोजीत होतें. साडेअकरा, बारा, साडेबारा आणि तसेच एक, दीड, दोन, अडीच, तीन......अखेर अगदीं उजाडलें. घड्याळाच्या प्रत्येक ठोक्यासरशीं माझी अस्वस्थता वाढत होती आणि प्रत्येक तासागणिक कधींहि भरून येऊं शकणार नाहीं असें माझें नुकसान होत असल्याचा मला भास होऊं लागला. अर्थात् हा सर्वांचाच अनुभव आहे म्हणा ! जाणारा प्रत्येक क्षण माझा सत्यानाश करीत आहे असें मला वाटूं लागलें.

कसल्या तरी क्षुल्लक अपघाताची कल्पना करून घेऊन डोक्याला विनाकारण शीण द्यावा असें मला वाटत नव्हतें. उदाहरणार्थ, चुंग मोटार लॉरीखालीं चेंगरला असेल किंवा अतिश्रमानें गळून पडला असेल व तेथेंच मेला असेल; किंवा एखादें पिसाळलेलें कुत्रें चावलें असेल—वगैरे कल्पनांची मला फारशी भीति वाटत नव्हती. तरी पण अशाच प्रकारचे विचार राहून राहून डोक्यांत येत. किंबहुना असेंच कांहींतरी झालें असावें अशी मी इच्छाच करीत होतें म्हणा ना ! तो कां आला नसेल याविषयीं अगदीं अशक्य अशा गोष्टी सुद्धां माझ्या मनांत येऊन गेल्या. तरी पण त्या सर्वांहून भयंकर अशा एका घटनेसंबंधीं विचार करण्यास मात्र माझें मन तयार होईना आणि तीच घटना घडून येणें जास्त शक्य होतें.

आतां या वेळीं एखादा पोलिस किंवा सी. आय्. डी. जरी आला तरी मला बरें वाटेल. ही अनिश्चितता अगदीं असह्य होऊन राहिली आहे. या भयंकर हुरहुरीपेक्षां व काळजीपेक्षां ती अत्याधिक भयंकर बातमी—तो पकडला गेल्याची बातमी—ऐकणेंहि जास्त सोपें आहे, असें वाटूं लागलें आहे. असं वाटतंय् कीं मी आतां श्वासोच्छ्वासहि करूं शकणार नाहीं. खरंच माझें काय होणार ? एखाद्या निष्प्राण कलेवराप्रमाणें इथें पडून रहायचें—न कुणी विचारणारे न पुसणारे ! यापेक्षां कदाचित तुरुंगांत जाणेंहि जास्त चांगलें असेल !

## थोड्या वेळानंतरः—

लावली आला अन् चुंगविषयीं बातमी सांगून गेला. ज्याला मी इतकी भीत होतें तेंच झालें अखेर शेवटीं ! त्याच्या दाट भुंवया त्याच्या रुंद कपाळाकडे

वरच्या बाजूस सरकल्या होत्या त्यानें कांहीं सांगण्यापूर्वी त्याच्या चेहऱ्यावरूनच मी सर्व कांहीं ताडलें. त्यानें निराशेनें मान हलविली आणि सलाम करून एवढेंच बोलला,

" घात झाला ! "

" अरे, पण झालं तरी काय ? " मी विचारलें.

" चुंग पकडला गेला ! "

## २७ मे

मी नाहीं मरायची ! काल रात्रीं मी याविषयीं खूप विचार केला. त्या कुंग यू मध्येंच तिळतिळ झिजून मरणें सोपें होतें. कारण तेथें माझ्या तोंडांत कुणी भाताचें एक शीतहि घातलें नसतें. पण मी मरणार नाहीं ! लावलीनें मला थोडा धीर दिला. त्यानें मला आपल्या घरीं चलण्याचा सल्ला दिला. त्याची बायको डॉक्टरीण आहे. ती मला मदत करूं शकेल. चुंग पकडला गेला हीच ती आनंदाची बातमी असेल का, कीं जी ऐकून मला आतां जगावेंसें वाटूं लागलें आहे ?

इथें येण्यास मला लावलीनें मदत केली. त्यांच्या दोन लहानशा खोल्यांपैकीं एका खोलींत माझा बिछाना आहे. या खोल्या त्यांनीं या घराच्या कोरियन मालका-कडून भाड्यानें घेतल्या आहेत. तो मोठा सुहृदय माणूस आहे. या घराच्या दुसऱ्या हिश्श्यांतच तो स्वतः राहतो.

लावलीची कोरियन पत्नी दिसायला मोठी विचित्र आहे. तिचा चेहरा काळसर पिवळा आहे. अगदीं बारीकसे पिंगट डोळे आणि मोठेमोठे ओठ. शरीरानं चांगलीच ऐसपैस आहे. आपल्या हाडकुळ्या नवऱ्याच्या अगदीं उलट ! चीनमध्यें येऊन तिला फार थोडे दिवस झाले आहेत. यामुळें बोलतांना तिला शब्द शोधावे लागतात, आणि जेव्हां ते मिळत नाहींत ( व असें नेहमींच होतें म्हणा ! ) तेव्हां मोठ्या विचित्र पद्धतीनें हंसून ती वेळ मारून नेते.

माझा विचार जेव्हां मी तिला सांगितला, तेव्हां तिला धक्का बसल्याचा मला भास झाला. प्रथम थोडा वेळ ती गप्प बसली; आणि जोरजोरांत मान हलवूं लागली. थोड्या वेळानें तिच्या त्या बारीक डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्या

तिचे फुगीर गाल अश्रूंनीं भिजून गेले. आणि ती अस्वस्थ मनानें माझ्या अंथरुणावर येऊन वसली; व आपल्या भरदार छातीशीं मला जोरजोरनें कवटाळून मोठमोठ्यानें हुंदके देऊं लागली, अंगांत भूत संचारल्याप्रमाणें जोरजोरांत बोलूं लागली, "छे:ःछे: ! मुळींच नाहीं. तुला तसें मुळीं करतां यायचें नाहीं !"

लावलीनें हलुवार शब्दांनीं तिचें समाधान केलें आणि कोरियन भाषेंत तिला कांहींतरी सांगितलें. (अर्थात् मला त्याचें बोलणें मुळींच समजलें नाहीं.) एकाद्या लहान पोरक्या पोरीप्रमाणें ती स्फुंदून स्फुंदून रडत होती. लावलीनें तिचें सांत्वन करून तिला शांत केलें; आणि अखेर तिनें मला मदत करण्याचें वचन दिलें.

दोन्ही खोल्यांत मिळून फक्त एकच पलंग आहे. काल रात्रीं लावलीला व त्याच्या वायकोला टेबलें एकमेकांस जोडून मजसमोरच झोपावें लागलें. संध्याकाळीं लीताई ताईनें ( लावलीच्या पत्नीचें नांव ) आपल्या आयुष्यांतील कांहीं घटना मला ऐकविल्या.

आज तिचें वय ३९ वर्षांचें आहे. पण मूलवाळ कांहीं नाहीं. आपल्याला एक मुलगा असावा अशी तिची फार फार इच्छा आहे. पण योगायोग असा कीं आज-पर्यंत ज्या ज्या वेळीं तिची ही इच्छा पूर्ण व्हायची वेळ येई त्या त्या वेळीं तिच्या सर्व आशा धुळीस मिळून जात.

लीताई ताईचें घराणें ख्रिश्चन आहे. जेव्हां तिनें या क्रान्तिकारक तरुणाशीं लग्न केलें तेव्हां तिच्या घरचे लोक तिच्यावर भयंकर रागावले आणि यापुढें तिच्याशीं कोणत्याहि प्रकारचा संबंध ठेवावयाचा नाहीं असें त्यांनीं ठरवलें. त्यांना इतका राग यावयाचें विशेष कारण म्हणजे त्यांनीं तिच्या शिक्षणापायीं–तिला डॉक्टर वनविण्या-साठीं जो पाण्यासारखा पैसा खर्च केला त्याचें, तिनें कांहीं चीज केलें नाहीं. कारण त्यांना वाटे कीं ही कसलें भिकारडें काम घेऊन वसली आहे ! आणि म्हणून यापुढें तिला काडीचीहि मदत करावयाची नाहीं असें त्यांनीं ठरवलें.

लावली क्रान्तिकार्यांत अगदीं गढून गेला होता. त्याच्याजवळ पैसा असा क्वचितच असे. आपल्या वायकोला एकटी सोडून त्याला कित्येक आठवडे व कित्येक महिने लपूनछपून काढावे लागत. जेव्हां जेव्हां ती गर्भवती असेल तेव्हां तेव्हां लावली, हटकून संकटांत सांपडलेला असावयाचाच व त्यामुळें तिला धक्का वसे, दुःख होई

अनुक्रम ........
विभाग ........ ४१....
क्रमांक

मरणांतिक यातना सोसाव्या लागत. शिवाय तिच्याजवळ पैसेहि इतके थोडे असत कीं, पोटभर खायला प्यायलाहि मिळत नसे. अशा प्रकारें तिला आतांपर्यंत सात वेळां आपल्या पोटच्या गोळ्यास मुकावें लागलें आहे!

सात वेळां! हा भयंकर आघात सात वेळां सहन करणें एखाद्या स्त्रीला शक्य आहे काय? स्त्रिया आणि क्रान्ति! जगाच्या इतिहासांत अशा प्रकारचीं किती दुःखपूर्ण व बहादुरीचीं गीतें न गायिलीं जातांच पडलीं असतील बरें?

जेव्हां ती आठव्या वेळीं गर्भवती राहिली तेव्हां लावलीनें त्रासून कांहीं दिवस सुटी घेतली आणि थोडेसें कर्ज काढून तो तिला समुद्रकाठीं घेऊन गेला. तिला कसलाहि त्रास पडूं नये याची शक्य तितकी खबरदारी त्यानें घेतली. तिचें मन प्रसन्न राखण्यासाठीं तो सारखा झटत होता. अखेर शेवटीं मुलगा झाला! अत्यंत सुदृढ व सुंदर होता तो मुलगा. पुरा सात महिन्यांचा होतो न होतो तोंच आपल्या बोबड्या बोलांनीं आणि बालसुलभ गोड चाळ्यांनीं तो आपल्या आईबापांना मोहून टाकूं लागला. अशी ही अलौकिक दौलत मिळाल्यानें लावली व लीताई ताई किती खुष झाले असतील याची कल्पनाच केलेली बरी.

परंतु याच वेळीं लावलीला आणि त्याच्या बायकोला एकाच वेळीं पकडून तुरुंगांत डांबून टाकण्यांत आलें. त्यांच्याबरोबर अर्थातच त्यांचा लहानगा बाळहि होता. जेल-मधील दहा दिवस एकाद्या लहान मुलास मारून टाकण्यास पुरेसे असतात नाहीं? त्यांचा आशादीप अशा प्रकारें मालवला.

ती अभागी स्त्री सांगत होती अन् स्फुंदून स्फुंदून रडत होती, तिचा पति तिच्या-जवळ बसून हळुवारपणें तिच्या पाठीवरून हात फिरवीत होता. व अधूनमधून तिला चार दोन समजुतीच्या गोष्टीहि सांगत होता. तिच्या हृदयांत दुःखाची जी आग आंतल्या आंत जळत होती ती अशा प्रकारें बाहेर पडून शांत होत असल्याचें पाहून त्याला बरें वाटत होतें. त्याच्या स्वतःच्या मनावरहि कांहीं कमी आघात झालला नव्हता; तरी पण अधूनमधून ती ज्या गोष्टी सांगावयास विसरे त्यांची तो तिला आठवण करून देई; आणि भाषेच्या अडचणीमुळें ती जेव्हां अडखळे तेव्हां तिला चिनी शब्द सुचवी.

आज सकाळीं डॉक्टर लीनें दिलेली एक लहानशी गोळी तिच्या सांगण्याप्रमाणें मी गिळून टाकली. ती म्हणते कीं, एक गोळी एक महिन्याच्या गर्भाचा नाश करूं शकते तीन महिन्याचा गर्भपात करण्यास तीन गोळ्या लागतील या गोळ्या खाल्ल्यानंतर तीन दिवसांनीं ' सब ठीक ' होऊन जाईल.

## तिसरा प्रहरः—

मे महिन्यांतील ही वावटळ गोबीच्या वाळवंटांतील खंडोगणती धूळ व रेती उडवून डोळे,नाक व घसा यांच्यांत जणूं आग लावून देत आहे. नुसती ही वावटळच पुष्कळशा धट्टाकट्टया माणसांना आजारी पाडण्यास पुरेशी आहे. बाहेर सोसाट्याचें वारें सुटलें आहे. आणि अगदीं बारीक अशी वाळू बाहेरून येऊन आंतील वस्तूंना झांकून टाकीत आहे. अशा वेळीं माझ्या मनांत कोणते भावनातरंग उठत आहेत हें लिहिण्यांत मला एक प्रकारचा आसुरी आनंद होत आहे. पुढें मागें माझ्या या कैफियती पासून लोकांना कदाचित् कांहींतरी धडा घेतां येईल.

तें कांहींहि होवो! सध्यां तरी मला असं वाटूं लागलंय कीं माझ्या शरीराच्या प्रत्येक सांध्यां–सांध्यांतून केसाळ व घाणेरडे किडे सरपटत आहेत ! असं वाटतंय कीं जर कांहींतरी जादू करून हे किडे बाहेर पडतील तर आपल्याबरोबर ते माझ्या साऱ्या जीवनाचें सत्त्वही घेऊन बाहेर येतील ! अयाई !.........

## नंतर

नुकतेंच मला असें दिसलें कीं चुंगला यातना दिल्या जात आहेत ! बारीक व निस्तेज डोळ्यांचा एक म्हातारा त्याच्या अंगावर वांकलेला होता. त्याच्या हातांत एक तोटी असलेली लहानशी झारी होती. त्या झारींतील 'तिखट' कालवलेलें 'पाणी' तो चुंगच्या नाकांत घालीत होता. व तोंडानें कन्फ्युशियसचें हें वाक्य बडबडत होता. 'मनुष्याला सुधारण्याच्या मार्गांपैकीं ज्यांचा जास्त गाजावाजा होत असतो ते अत्यंत कमी महत्त्वाचे असतात.'

त्या म्हाताऱ्याच्या तावडींतून आपली सुटका करून घेण्यासाठीं चुंग हातपाय झाडीत होता. तो इतक्या जोरजोरनें किंचाळत होता कीं, ऐकणाऱ्याचा भीतीनें थरकांप उडावा. त्यानें आपलें तोंड वळविण्याचा प्रयत्न करून पाहिला. पण त्याच्या तोंडांत

लगामाप्रमाणें अेक दोरी अडकविलेली होती. ती अगदीं आवळून बांधलेली होती. यामुळें मान वळविण्याच्या प्रयत्नांत त्याचे ओठ फाटले. त्याच्या नाकांतून, तोंडांतून व डोळ्यांतून पाण्याच्या धारा चालल्या होत्या. तो कितीतरी वेळां मूर्च्छा येऊन प[illegible] इत्याला छळणारे लोक त्याला उलटासुलटा करून त्याच्या नाकातोंडांतील पाणी काढून टाकीत व त्याला पुन्हां शुद्धीवर आणीत.

सुमारें चाळीस झाऱ्यांहून जास्त पाणी त्याच्या नाकांतोंडांत ओतलें गेलें. !

अधूनमधून जेव्हां त्याची उलटतपासणी करावयाची असेल तेव्हां त्याची छळणूक थांबविण्यांत येई. मी अगदीं असहाय्यपणें त्याच्या त्या यातना आपल्या डोळ्यांनीं पहात होते. मला असा भास झाला कीं कुणीतरी धक्के मारून मला त्याच्या समोर उभें केलें आहे आणि माझ्या उघड्या पाठीवर कोरडे मारले जात आहेत. त्या लोकांनीं मला जोरांत दरडावून हुकूम केला , " याला सरळ सरळ उत्तरें द्यायला सांग! सांग म्हणावं आपला खरोखर पत्ता ! " मला असाहि भास झाला कीं मी तसें सांगण्याचें नाकारल्यामुळें त्यांनीं माझ्या ओठांना डागण्या द्यायला सुरवात केली आहे.

चुंगनें मला ओळखलें नाहीं हें अगदीं उघड उघड दिसत होतें. असेंहि असूं शकेल तो त्यानें मला पाहिलेंहि नसेल. त्याच्या चेहऱ्यावर लाल, निळे, हिरवे ओरखडे पडले होते. त्याचे केस रक्तानें माखलेले होते. तो मजकडे अशा कांहीं भकास नजरेनें पहात होता कीं त्यावरून काय चाललं आहे याचीहि तिला जाणीव नसावी हें स्पष्ट दिसत होतें.

खरें म्हटलें असतां, मला पकडल्यानंतर घरचा पत्ता विचारण्यासाठीं चुंगला छळण्यांत काय अर्थ होता ? त्याच्याकडून दुसरा एखादा पत्ता मिळविण्याची ते खटपट करीत असतील काय ? त्याला त्रास देऊन देऊन त्यांनीं जणूं त्याचं मनुष्यत्वच नष्ट करून टाकलें होतें. मग आतां तो जंगली कार्यक्रम चालू ठेवण्यांत काय अर्थ होता ? असा त्रास देऊन ते त्याला घाबरवून टाकूं इच्छीत असतील काय ? माझ्या कांहींच ध्यानांत येईना ! मी जोरांत ओरडण्याची धडपड केली. ते लोक माझ्याजवळ आले. त्यांनीं माझें पोलकें व आंतील चॉडी ओढून फाडून टाकली आणि मला चुंगच्या समोर नेऊन माझ्या उघड्या पाठीवर व छातीवर कोरडे उडविण्याची तयारी केली. इतक्यांत मी जोरानें किंचाळलें.

मी जागी झालें. लीताई ताईचा चेहरा माझ्या दृष्टीस पडला. ती माझ्या कमरेला आपल्या हाताचा विळखा घालून बसली होती. तिनें आपले बारीक डोळे माझ्या डोळ्यांजवळ आणले ते विस्फारलेले दिसत होते व त्यांच्यांतून आश्चर्य व भीति व्यक्त होत होती.

" हें काय ? " तिनें विचारलें. " झालं तरी काय ? "

मला ज्या प्रकारच्या छळणुकीचें स्वप्न पडलें होतें. अगदीं थेट तशा प्रकारचा छळ ' ई ' व ' प ' यांचा झाला होता. पण चुंग पत्ता सांगण्यास तयार होत नव्हता याचा अर्थ काय ? मी अजूनपर्यंत कुंग यू मध्येंच एकटी व असहाय्य स्थितींत पडून असेन अशा समजुतीनें चुंग आमच्या घरचा पत्ता को. म. टा. ( कोइमटांग ) ला देणार नाहीं व त्यासाठीं वाटेल त्या हालअपेष्टा सहन करील अशा प्रकारचे विचार माझ्या डोक्यांत थैमान घालीत असतात. व त्यामुळेंच असलें हें स्वप्न दिवसाढवळ्या मला पडलें असलें पाहिजे यांत शंका नाहीं.

## २८ मे

( सोसाट्याचा वारा सुटला आहे. )

खरोखरीच सोसाट्याचं वारं सुटलंय् !

जसजसा वाऱ्याचा जोर वाढतो तसतसा माझा तापहि वाढतो आणि जेव्हां वारं वहायचं थांबतं तेव्हां मला जणूं हिंव भरून येतं. खिडकीला लावलेले सगळे कागद या वाऱ्यामुळं पार फाटून गेले आहेत. असह्य प्रसूतिवेदनांमुळें कण्हणाऱ्या स्त्रीप्रमाणें हें वारें खिडकीशीं येऊन आंत डोकावून पहात करुण किंकाळ्या फोडीत आहे.—पण हें सर्व मी वातांत तर भरकटत नाहीं ना ?

मला ताप आल्यामुळें डॉक्टर लीनें आज मला दुसरी गोळी देण्याचें नाकारलें. मी तिच्याकडे अजीजीनें मागितलें. तिची खूप विनवणी केली. तिला म्हणालें, " एकदां सुरवात केलीय् खरी, मग आतां अनमान कशासाठीं ? ही ट्रीटमेंट ( उपचार ) केव्हां एकदां संपेल आणि मी पुन्हां पहिल्यासारखी नाजीतवानी होऊन जगांत प्रवेश करीन असं मला झालंय् ! माझें व चुंगचें काम पुन्हां पूर्वीप्रमाणें चालू करण्याची मला अगदीं उत्कंठा लागून राहिलीय् ! "—शिवाय डॉक्टर लीचे पैसे व वेळ आतां मजवर

अनुक्रम
विभाग

अधिक खर्च होऊं नयेत ही एक वोचणी जिवाला आहेच कीं ! और हें. सर्व करायचं तरी कशासाठीं ? यांतून निष्पन्न तें काय होणार ? उलट कांहीं निष्पन्न होऊं नये म्हणून तर ही खटपट चालूं आहे !

अखेर तिनें मला दोन लांवट आकाराच्या मोठाल्या गोळ्या दिल्या. त्या मीं एकाच दमांत गिळून टाकल्या.

## मध्यरात्रः—

शाव फुंग आतांच धावऱ्या धावऱ्या धांवत आला होता.मला इथें पहातांच त्याचा चेहरा भीतीनें व काळजीनें एकदम पांढरा फटफटीत पडला. तो लावलीला व त्याच्या वायकोला तावडतोब हें घर सोडून दुसरीकडे पलायन करण्याची सूचना देण्यासाठीं आला होता. शिवाय डॉक्टर लीकडून त्याला आपल्या जखमांची मलमपट्टीही करून घ्यायची होती.

त्याचं असं झालं. परवां सायंकाळीं शाव फुंग कांहीं सामान घेऊन सायकलवरून चालला होता. ज्या वेळीं तो 'पी होयन' रस्त्यावर पोहोंचला तेव्हां समोरून येणाऱ्या एका सायकलशीं त्याची एकदम टक्कर झाली. त्याच वेळीं एका गुप्त पोलिसानें त्याला कोठून पाहिलं कोण जाणे ! तो जो आला तों त्यानें शाव फुंगची मानगुटीच पकडली. आणि जोरजोरानें पोलिसाला हांका मारूं लागला. शाव फुंगनें सारें बळ एक-वटून त्याला एका रिक्शावर ढकलून दिलें आणि तेथून यःपलायन केलें. लहान लहान बोळांतून व मोडक्या तोडक्या भिंताडावरून उड्या मारीत आणि जुनाट घरांचा आडोसा घेत घेत तो कसाबसा तेथून निसटला. या सगळ्या गडबडींत त्याच्या डाव्या हातास दुखापत झाली होती. डॉक्टर लीनें त्याच्या जखमा धुवून त्यांवर मलमपट्टी बांधली. मजकडे चिंताग्रस्त नजरेनें पहात तो घाईघाईनें निघून गेला.

## २९ मे

'इथून तावडतोब निघून जा !' –काय हें दुर्दैव माझें! इथें अशा या निःसहाय्य व लाचारस्थितींत पडून राहून मी माझ्या मित्रांचेहि प्राण धोक्यांत घालीत आहे. वुड-त्याच्या गळ्यांतील दगड बनण्याचेंच माझ्या नशिबी आहे काय ? उद्यां मेची ३०

५३००
वा. वा.



तारीख * चीनच्या जागृतीचा दिवस. उद्यां ठिकठिकाणची जनता आपल्या वाढत्या शक्तीचें व संघटनेचीं निदर्शनें करणार ! उद्यां साऱ्या राष्ट्रांतील तरुण स्त्रीपुरुष वीरांप्रमाणें पुढें पाऊल टाकणार !–त्यांपैकीं कांहीं मारले जातील अन् त्यांच्या मृत्युमुळे जनतेच्या उत्साहशक्तीला भरती येईल. 'अशा वेळीं मी या भाराखालीं खचून गेलें आहे ! स्त्रिया आणि क्रान्ति ! किती असंवादी, किती विजोड गोष्ट आहे ही !

## ३० मे

आज निदर्शनें सुरू होण्यापूर्वीच आमच्यापैकीं प्रत्येकाला खड्याप्रमाणें वेंचून काढून तुरुंगांत डांबण्यांत येईल. या बाबतींत सरकार थोडीसुद्धां हयगय करणार नाहीं. ली पतिपत्नी कोरियन भाषेंत बोलत आहेत. ' तुम्ही येथून बेधडक निघून जा ! ' असें मीं त्यांना सांगून टाकणार आहे. त्यांनीं माझ्यासाठीं या संकटांत रहावें अशी माझी मुळींच इच्छा नाहीं. त्यांनीं मला एकटीला सोडून देणेचें जास्त योग्य होईल. पण माझ्या ओठांतील अस्फुट किंकाळी त्यांना माझ्या भावना विदीत करील. मला एकाएकीं असें वाटूं लागलें आहे कीं माझ्या गर्भाशयांत कुणीतरी हजारों लाल लाल तापलेल्या सुया खुपसत आहे. ही जी माझी अप्रगट किंकाळी आहे. ती त्यांना समजूं नये, माझ्या दुःखाची त्यांना कल्पना येऊं नये यासाठीं मी हें सगळें भरकटत आहे. या लाही लाही होण्यानें, या खाजेनें व या टोचणीनें माझें सगळें शरीर फुटून जातें कीं काय असें वाटत आहे. विजेचा धक्का बसावा त्याप्रमाणें माझें सगळें शरीर हादरतें आहे. माझ्या भोंतालची प्रत्येक वस्तु प्राणघातक आहे; विषानें भरलेली आहे असा मला भास होत आहे. माझ्या शरीरांतून एक लालगरम धोंडा कोणत्या वेळीं फटदिशीं बाहेर पडेल कांहीं सांगतां येत नाहीं – आणि दुसरा धोंडा माझ्या डोक्यांतून बाहेर पडूं पहात आहे. ! —

—शिहमिंग

IRBK-0105300
IRBK-0105300

* ता. ३० मे १९२५ रोजीं विदेशी शिपायांनीं चीनमधील एका निदर्शनावर गोळीबार केला होता. पुष्कळ विद्यार्थी व कामकरी ठार झाले. या घटनेमुळें सबंध चीन खडबडून जागा झाला.